cmyk

दैनिक **राज्य लोकतंत्र**

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र | वर्ष – ४ | अंक–८१ | गुरूवार दि.११ जुलै २०२४ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | • पाने– ६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय

### ऐतिहासिक सत्तांतर!

ब्रिटनमध्ये मागच्या १४ वर्षांपासून सत्तेत असणा–या हुजूर पक्षाचा १९० वर्षांमधला सर्वांत दारुण पराभव करत ब्रिटनच्या जनतेने ऐतिहासिक सत्तांतर घडविले आहे. किअर स्टार्मर यांच्या नेतृत्वात मजूर पक्षाने ६५० जागांपैकी ४१२ जागांवर विजय मिळवत ब्रिटनची एकहाती सत्ता प्राप्त केली आहे. जनाधार पुरता कमी होण्याच्या आधी निवडणूक घेण्याची पंतप्रधान ऋषी सुनक यांची खेळी फारशी लाभदायक ठरली नाहीच. हुजूर पक्षातला भ्रष्टाचार, पक्षांतर्गत लाथाळ्या, नेत्यांचा उथळपणा, उर्मटपणा, पक्षांतर्गत राजकारणातून होत असलेले सततचे नेतृत्वबदल, नेतृत्वाची अकार्यक्षमता, ब्रेग्झिट धोरणाबाबतचा गोंधळ

### शिंदे सरकारचे राज्य सरकारी कर्मचाऱ्यांना मोठे गिफ्ट

मुंबईःमहाराष्ट्र सरकारने राज्यातील शासकीय कर्मचाऱ्यांना मोठे गिफ्ट दिले आहे. शासकीय कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्यात ४६ टक्क्यांवरून ५० टक्क्यांपर्यंत वाढ करण्यात आली आहे. ही वाढ १ जानेवारी २०२४ पासून पूर्वलक्षी प्रभावाने लागू होणार आहे. राज्य सरकारने नुकतंच ऊर्जा विभागातील कर्मचारी आणि अधिकाऱ्यांच्या भत्त्यात वाढ केली होती. त्यानंतर आता राज्य शासनातील सर्व सरकारी कर्मचाऱ्यांसाठी महागाई भत्त्यात ४६ टक्क्यांवरून ५० टक्क्यांपर्यंत वाढ करण्यात आली आहे. त्यामुळे राज्य सरकारमधील शासकीय कर्मचाऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे.

# पीएम किसानचे शेतकऱ्यांना मिळणार वार्षिक १०,००० रुपये

## मोठ्या बदलाची नांदी, केंद्रीय अर्थसंकल्पात होऊ शकते घोषणा

**नवी दिल्ली । वृतसंस्था**

**केंद्र सरकार शेतकऱ्यांना पीएम किसान योजनेचा हप्ता वाढवून दिलासा देण्याच्या प्रयत्नात आहे. सध्या पीएम किसान योजनेतंर्गत वार्षिक ६ हजार रुपये हप्ता मिळतो. या हप्त्यात भरघोस वाढीची योजना आहे. वर्षाला १० हजार रुपये देण्याची घोषणा या अर्थसंकल्पात होण्याची दाट शक्यता आहे.**

केंद्रात राष्ट्रीय लोकशाही आघाडीने तिसऱ्यांदा सत्ता स्थापन केली. हे सरकार यंदा त्यांचा पहिला अर्थसंकल्प सादर करेल. अर्थमंत्री निर्मला सीतारमण या आर्थिक वर्ष २०२४–२५ साठी महत्वपूर्ण घोषणा करतील. शेतकऱ्यांना या बजेटकडून मोठ्या अपेक्षा आहे. त्यांना खते आणि रसायनांवरील ◀◀ पान २ वर




### शेतकऱ्यांना असा होईल फायदा

पीएम किसान योजनेचा हप्ता वाढला तर शेतकऱ्यांना अनेक कामासाठी ही रक्कम उपयोगी पडेल. त्यांना खते, बि–बियाणे खरेदीसाठी त्याचा वापर करता येईल. केंद्र सरकारने फेब्रुवारी २०१९ मध्ये शेतकऱ्यांन मदतीसाठी पीएम किसानची घोषणा केली होती. तिसऱ्यांदा पंतप्रधान झाल्यानंतर नरेंद्र मोदी यांनी पीएम किसान योजनेचा १७ वा हप्ता नुकताच जमा केला.

### अंतर्गत सबसिडी देण्याची मागणी

किसान सन्मान निधीची योजनेत थेट शेतकऱ्यांच्या बँक खात्यात डायरेक्ट बेनिफिट ट्रान्सफरतंर्गत रक्कम जमा होते. दर चार महिन्यांनी तीन हप्त्यात ही रक्कम जमा करण्यात येते. पण पात्रता निकष, त्यातील काही अटी आणि शर्तींमध्ये अडकलेल्या काही शेतकऱ्यांना त्याचा लाभ मिळत नाही. त्यामुळे आता सरकारने शेती अवजारे, ट्रॅक्टर, खत, रसायने आणि शेतीसंबंधीच्या इतर खरेदीवर सबसिडी द्यावी आणि ती डीबीटी माध्यमामार्फत थेट शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करण्याची मागणी पण जोर धरु लागली आहे.

## थोडक्यात

### एमसीएच्या निवडणुकीतून नाना पटोलेंची माघार

मुंबई–मुंबई क्रिकेट असोशिएशनच्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीतून नाना पटोले यांनी माघार घेतली आहे. आज नाना पटोले आणि भूषण पाटील यांनी अध्यक्षपदासाठी उमेदवार दाखल केला होता. मात्र, नाना पटोले यांनी उमेदवारी अर्ज मागे घेतल्याने भूषण पाटील, विहंग सरनाईक आणि अजिंक्य नाईक यांच्यात लढत होणार आहे.

### हिंगोली, परभणीत भूकंपाचे सौम्य धक्के

परभणी–हिंगोली, परभणी सह तीन जिल्ह्यात मागील काही वर्षांपासून जमिनीतून गूढ आवाज येत आहे. आज सकाळी ७ वाजून १४ मिनिटांना भुगर्भातून आवाज आला. या तीनही जिल्ह्यातील अनेक गावात भूकंपाचा सौम्य धक्का जाणवला आहे. त्यामुळे नागरीकांमध्ये भितीचे वातावरण आहे.

### गुवाहाटीच्या पुनरावृत्तीचा ठाकरेंना धसका

मुंबई–विधान परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय घडामोडींना वेग आला आहे. ठाकरे गटाने आपल्या पक्षाच्या सर्व १६ आमदारांना आज परेल येथील ग्रँड हॉटेल येथे बोलावले आहे. याच हॉटेलमध्ये आजपासून निवडणुकीच्या दिवसापर्यंत आमदारांना ठेवले जाणार आहे. गुवाहाटीच्या पुनरावृत्तीचा धसका घेतल्याचे दिसत असून एकाच मजल्यावर सर्व आमदार सीसीटीव्हीची निगराणीखाली आहेत. महायुतीच्या एका उमेदवारामुळे या निवडणुकीत दगाफटका होण्याची भीती आहे. त्यामुळे प्रत्येक पक्षाकडून काळजी घेतली जात आहे. शिवसेना ठाकरे गटाकडून यासाठी विशेष काळजी घेतली जात आहे.

# ते कधीही मराठ्यांच्या मोर्चात दिसले नाहीत, ना आरक्षणावर ब्र शब्द काढला

## मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचा शरद पवारांवर नाव न घेता हल्लाबोल

**मुंबई । प्रतिनिधी**

**मराठा आणि ओबीसी प्रश्नावर मार्ग काढण्यासाठी बोलावलेल्या बैठकीला विरोधक गैरहजर होते. विधिमंडळ अधिवेशनातही याचे पडसाद पाहायला मिळाले. मराठा आरक्षणासंदर्भात विरोधकांनी घेतलेल्या भूमिकेवरुन सत्ताधारी चांगलेच संतापल्याचे पाहायला मिळाले. विरोधकांना दोन्ही समाजातील तेढ कायम ठेऊन आपली राजकीय पोळी भाजायची आहे, असा आरोपही महायुतीच्या नेत्यांनी केला. त्यातच, राज्याचे महसूलमंत्री आणि भाजप नेते राधाकृष्ण विखे पाटील यांनी नाव न**





**घेता थेट शरद पवारांवरच हल्लाबोल केला.**

### विखे पाटलांचे जरांगेंना आवाहन

*मराठा समाजाच्या आरक्षणाचा नेमका शत्रू कोण, आरक्षण कोण देत नाहीत, हे मनोज जरांगे यांनी ओळखले पाहिजे, पाटील यांनी अशा लोकांचे गावबंद केले पाहिजे, असे म्हणत जरांगे यांनाही विखे पाटलांनी आवाहन केलं आहे.*

मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावरुन सभागृहात चांगलाच राडा पाहायला मिळाला. यावेळी, विरोधकांनी मराठा–ओबीसी आरक्षणाच्या बैठकीकडे ◀◀ पान २ वर

### मराठा आरक्षणप्रश्नी सरकारने भूमिका स्पष्ट करावी– खा.अमोल कोल्हे

मुंबई– मराठा आरक्षण संदर्भात बोलाविलेल्या बैठकीला महाविकास आघाडीचे नेते उपस्थित नसल्याने मुख्यमंत्री उपमुख्यमंत्री यांनी महाविकास आघाडीवर निशाणा साधला. याला खासदार अमोल कोल्हे यांनी प्रतिउत्तर देत सरकारने जनतेत संभ्रम निर्माण करु नये असे म्हटले आहे. महाविकास आघाडीची भूमिका स्पष्ट असून ◀◀ पान २ वर



## एकही नोंद रद्द झाली तर महाराष्ट्रातील सर्व रस्ते जाम करा

### मनोज जरांगे आक्रमक; मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनाही दिला इशारा

**धाराशिवः राज्यातील एकही नोंद रद्द होऊ द्यायची नाही. जर एक जरी नोंद रद्द झाली तर रस्ता जाम करा. महाराष्ट्रातील सगळे रस्ते जाम करा. गोरगरीब मराठ्यांना गावखेड्यात अन्याय सुरू झाला आहे. त्यामुळे त्याच्यावर अन्याय होत असेल तर तो आडवा, असे आवाहन मनोज जरांगे पाटील यांनी धाराशिवच्या सभेत मराठा समाजाला केले आहे. एकही नोंद रद्द झाली तर २८८ आमदार पाडले म्हणून समजा, असा इशारा जरांगे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना दिला आहे.**



मनोज जरांगे म्हणाले, जातीवादचे उत्तम उदाहरण म्हणजे मंत्री छगन भुजबळ. मराठा नोंदी रद्द करण्याची मागणी केली. देशात केवळ मराठ्यांच्या नोंदी सरकारी आहेत. बाकी कोणाच्या नोंदी सरकारी नाहीत. मुख्यमंत्री साहेब, एकही नोंद रद्द केली तर याद राखा. तुमचे २८८ आमदार पाडले म्हणून समजा, असा मोठा इशारा मराठा नेते मनोज ◀◀ पान २ वर


### आता नाव घेऊन बोललो तर अवघड होईल

*भुजबळच्या नादात तुमच्यावर वाईट वेळ येईल. ओबीसी मतांची गरज आहे म्हणून ओबीसीला जवळ कराल. पण भुजबळचं ऐकून तुम्ही भाजपचं नुकसान करून घेऊ नका. मी लोकसभेला केवळ पाडा म्हणालो. आता नाव घेऊन बोललो तर अवघड होईल. सन्मान घ्यायला दुसऱ्याचा सन्मान करावा लागतो. मराठ्यांची सत्ता येणार आणि त्यावेळी जातीवादी अधिकाऱ्यांचा हिशोब होणार म्हणजे होणार. जातीवाद करणाऱ्या अधिकाऱ्यांना आणून बसवले. ज्यांनी आमच्यावर गोळ्या झाडल्या त्या अधिकाऱ्यांना बडतर्फ करण्याऐवजी बढती दिली, असा आरोप मनोज जरांगे यांनी केला.*

## मराठा आरक्षणावरील सुनावणी ऑगस्टपर्यंत तहकूब

**मुंबई** : राज्य सरकारने मराठा समाजाला दिलेल्या १० टक्के आरक्षणाची कायदेशीर लढाई सुरू असून आज मुंबई उच्च न्यायालयात याबाबत सुनावणी झाली. मराठा आरक्षणाला विरोध करणाऱ्या याचिकांवर सरकारच्यावतीने राज्य मागास आयोगाकडून बाजू मांडण्यात येत आहे. मात्र, आयोगाचे वकील विदेशात असल्याने मुदतवाढ मिळावी, अशी मागणी आयोगाच्यावतीने करण्यात आली होती. त्यावर, उच्च न्यायालयाने तीन आठवड्यांची ◀◀ पान २ वर

### आयोगाला ३ आठवडे मुदतवाढ




### ५ ऑगस्टपासून नियमीत सुनावणी

मराठा आरक्षणाबाबतच्या सर्व याचिकांवर ५ ऑगस्टपासून नियमित सुनावणी घेण्याचं हायकोर्टाकडून निश्चित करण्यात आलं आहे. त्यामुळे, मराठा आरक्षणावरील कायदेशीर पेच सुटण्यास आणखी वेळ द्यावा लागणार आहे.

## आरक्षणाबाबत आपली भूमिका लेखी कळवावी– मुख्यमंत्री

मुंबईः आरक्षणाबाबत आपली भूमिका लेखी कळवावी, असे आवाहन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी राजकीय पक्षांना केले आहे. राज्यात मराठा आणि ओबीसी समाजात तेढ निर्माण होऊ नये, पुरोगामी महाराष्ट्राची परंपरा अबाधित राखतानाच राज्य शासन कुठल्याही समाज घटकावर अन्याय होऊ देणार नाही, अशी ग्वाही देऊन आरक्षणाबाबत राजकीय पक्षांनी आपली लेखी भूमिका, अभिप्राय शासनाला कळवावेत, असे आवाहन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले.



## मनोज जरांगे आज बीडमध्ये: भव्य दिव्य रॅली निघणार

### शहरातील सर्व शाळांना सुट्टीः अनिल जगताप यांच्या पाठपुराव्यानंतर शिक्षण विभागाने घेतला निर्णय

**बीड । प्रतिनिधी**

सकल मराठा समाजाच्या वतीने आज गुरुवार दि. ११ जुलै रोजी बीड शहरामध्ये मराठा आरक्षण योद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्व मार्गदर्शनाखाली भव्य दिव्य स्वरूपात 'संघर्षयोद्धा शांतता रॅली' चे आयोजन करण्यात आले आहे. ही रॅली गुरूवारी सकाळी ११.०० वाजताच्या दरम्यान निघणार असून जिल्ह्याभरातून मराठा बांधव, महिला भगिनीं या मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत. त्यामुळे साहजिकच बीड शहरातील सर्व रस्ते सकाळी १०.०० वा ते सायंकाळी ०६ वा. पर्यंत बंद राहतील अशी परिस्थिती आहे. रॅलीच्या दरम्यान होणाऱ्या गर्दीमुळे शाळकरी मुलांची गैरसोय होऊ नये म्हणून मराठा सेवक अनिल जगताप यांनी ◀◀ पान २ वर



## बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.१० जुलै २०२४**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू : ६.५० क्विंटल | २,२९० | २,२९० | २,२९० |
| ज्वारी/हायब्रिड : ४.५० क्विंटल | २,२५० | २,४०० | २,३०६ |
| मूग : १.०० क्विंटल | ७,२७६ | ७,५०१ | ७,३८८ |
| तूर : ११.५० क्विंटल | ८,००० | १०,७०१ | ९,८०० |
| उडीद : १.५० क्विंटल | ७,०५१ | ७,०५१ | ७,०५१ |
| बाजरी: ४.०० क्विंटल | २,६४७ | २,६४७ | २,६४७ |
| चिंच/लोकल: २०.०० क्विंटल | १,१०० | ३,५५० | २,३२५ |
| सोयाबीन: ८४.०० क्विंटल | ४,४०० | ४,५२५ | ४,४७० |
| हरभरा: १.०० क्विंटल | ६,२५१ | ६,२५१ | ६,२५१ |

# टेन्शन संपले; बीटेक करणाऱ्यांसाठी इंग्रजीला शोधला पर्याय

## प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी आयआयटी जोधपुरने घेतला मोठा निर्णय




**जोधपुर । प्रतिनिधी**

**मातृभाषेत शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांना पुढे जाऊन आयआयटी, इंजिनीअरिंग, एमबीबीएस असे व्यावसायिक कोर्स करताना अडचणी येतात. दरम्यान इंजिनीअरिंग आणि एमबीबीएसचे शिक्षण हिंदी भाषेत करणार असल्याचे केंद्र सरकारने म्हटले होते. हिंदी शाळांमध्ये बारावीपर्यंत शिक्षण घेतल्यानंतर बीटेकमध्ये शिक्षण घेताना विद्यार्थ्यांना खूप संघर्ष करावा लागतो. पण आता बीटेक करणाऱ्यांसाठी महत्वाची अपडेट समोर आली आहे.**

भाषेचा अडसर असेल तर तुम्हाला हिंदी माध्यमातही बीटेक करता येणार आहे. जोधपुर येथे हा पहिला प्रयोग केला जाणार आहे. त्यांनी हिंदी माध्यमात पदवी अभ्यासक्रम सुरू केला आहे. प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांना वर्ग सुरू होण्यापूर्वी हिंदी आणि इंग्रजी माध्यमातील लेक्चर्स निवडण्याचा पर्याय दिला जाणार आहे. यातून विद्यार्थी ◀◀ पान २ वर

### गेल्या महिन्यातच मिळाली होती मान्यता

*जोधपूरच्या सिनेटने २६ जून रोजी झालेल्या ३८ व्या बैठकीत आणि २८ जून रोजी झालेल्या बोर्ड ऑफ गव्हर्नर्सच्या बैठकीत बी.टेक अभ्यासक्रम हिंदी माध्यमात सुरू करण्यास मान्यता दिली होती. त्यामुळे हिंदी मिडियमच्या विद्यार्थ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. असे असले तरी काही वर्षांपूर्वी आयआयटी संस्थांनी अभियांत्रिकी अभ्यासक्रम हिंदीतून सुरू करण्यास विरोध केला होता. त्यामुळे या निर्णयास विलंब झाला.*

### शिक्षण मंत्रालयाने दिली माहिती

*शिक्षण मंत्रालयाने सोशल मीडिया प्लॅटफॉर्म वर यासंदर्भात महत्वाची अपडेट दिली आहे. जोधपूरमध्ये हिंदी माध्यमात . अभ्यासक्रम सुरू झाल्याची माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली आहे. देशाच्या कानाकोपऱ्यातील गावखेड्यात राहणारे विद्यार्थी आयआयटी जोधपूरमध्ये शिक्षणासाठी येतात. हिंदी भाषेत शिक्षण झालेले असल्याने त्यांना इंग्रजीतून बीटेक करणे अवघड जाते. त्यांचा आत्मविश्वास ढासळतो. हे पाहता आयआयटी जोधपूरने हा निर्णय घेतला आहे. आयआयटी जोधपूर आता या शैक्षणिक सत्रापासून इंग्रजीसह हिंदीमध्ये बीटेक कोर्स शिकवला जाणार आहे. हे सांगताना आम्हाल खूप आनंद होतोय. हा उपक्रम सर्व विद्यार्थी त्यांना सर्वात सोयीस्कर असलेल्या भाषेत प्रभावीपणे शिकू शकतील अशा पद्धतीने डिझाइन केलाय, अशी माहिती आयआयटी जोधपूरने दिली आहे.*

cmyk

## अग्रलेख

# ऐतिहासिक सत्तांतर!

ब्रिटनमध्ये मागच्या १४ वर्षांपासून सत्तेत असणा–या हुजूर पक्षाचा १९० वर्षांमधला सर्वांत दारुण पराभव करत ब्रिटनच्या जनतेने ऐतिहासिक सत्तांतर घडविले आहे. किअर स्टार्मर यांच्या नेतृत्वात मजूर पक्षाने ६५० जागांपैकी ४१२ जागांवर विजय मिळवत ब्रिटनची एकहाती सत्ता प्राप्त केली आहे. जनाधार पुरता कमी होण्याच्या आधी निवडणूक घेण्याची पंतप्रधान ऋषी सुनक यांची खेळी फारशी लाभदायक ठरली नाहीच. हुजूर पक्षातला भ्रष्टाचार, पक्षांतर्गत लाथाळ्या, नेत्यांचा उथळपणा, उर्मटपणा, पक्षांतर्गत राजकारणातून होत असलेले सततचे नेतृत्वबदल, नेतृत्वाची अकार्यक्षमता, ब्रेग्झिट धोरणाबाबतचा गोंधळ, आर्थिक पातळीवरचा भोंगळ कारभार, त्यामुळे अडचणीत सापडलेली देशाची अर्थव्यवस्था, त्यातून वाढलेली प्रचंड महागाई, बेरोजगारी, करांचा अतिरिक्त बोजा अशा अनेक कारणांनी पुरत्या वैतागलेल्या ब्रिटिश मतदारांनी हुजूर पक्षाला मतपेटीतून जोरदार धडा शिकवला. हुजूर पक्षाला या निवडणुकीत अवघ्या १२१ जागांवर समाधान मानावे लागले. त्यांना तब्बल २५१ जागांचा फटका सहन करावा लागला. मजूर पक्षाने २७ वर्षांनंतर प्रथमच ४०० पेक्षा जास्त जागा जिंकून सत्ता काबिज करण्याचा विक्रम केला. मात्र, ब्रिटनच्या इतिहासातील सर्वांत जास्त म्हणजे ४१८ जागा जिंकण्याचा टोनी ब्लेअर यांचा विक्रम मजूर पक्षाला मोडता आला नाही. १९९७ मध्ये टोनी ब्लेअर यांच्या नेतृत्वात हुजूर पक्षाने ४१८ जागांवर विजय मिळविण्याचा विक्रम केला होता.

हा विक्रम मोडण्यात मजूर पक्ष थोडा कमी पडला असला तरी या पक्षाने 'चारसौ पार'चा विक्रम आपल्या नावे केला आहे. अर्थात प्रचारात तसा कुठला दावा न करताही त्यांनी हा विक्रम नोंदविला असल्याने तो विशेष कौतुकास्पद ठरतो! ब्रिटनच्या नागरिकांनी परिवर्तनाला कौल देत हुजूर पक्षाच्या भोंगळ कारभारावरचा आपला असंतोष व्यक्त केला आहे, असाच या ऐतिहासिक सत्तांतराचा अर्थ आहे. सुनक यांच्या पक्षाच्या पराभवाने भारतीयांची मने हळहळली कारण सुनक हे भारतीय वंशाचे आहेत. शिवाय भारताचे जावई आहेत. मात्र, हुजूर पक्षाचे बुडते जहाज त्यांना वाचविता आले नाही कारण काहीही केले तरी हे बुडते जहाज वाचविणे अशक्यच होते. त्यामुळेच ब्रिटनमधील १८ लाख भारतीय मतदारांनी हुजूर पक्षाला समर्थन दिले नाही. मात्र, याच निवडणुकीत ब्रिटनच्या संसदेत प्रथम २६ भारतीय वंशाचे खासदार निवडून आले आहेत. मागच्या वेळी ही संख्या १५ होती. त्यात लेस्टर मतदारसंघातील हुजूर पक्षाच्या शिवानी राज यांचा विजय लक्षवेधी ठरला. मागच्या ३७ वर्षांपासून मजूर पक्षाच्या ताब्यात असणारा हा मतदारसंघ त्यांनी हिसकावून घेतला. याच मतदारसंघात २०२२ मध्ये भारत व पाक समर्थकांमध्ये दंगल झाली होती. मजूर पक्षाच्या जोडीनेच लिबरल डेमॉक्रॅटिक पक्षानेही ७१ जागांवर विजय मिळवत शानदार कामगिरी केली आहे. मागच्यावेळी या पक्षाकडे अवघे ८ खासदार होते. त्यांनी यावेळी ६३ अतिरिक्त जागांवर विजय मिळवला आहे. युरोप, फ्रान्स, अमेरिका येथे मागच्या काही निवडणुकांमध्ये उजव्या विचारसरणीच्या पक्षांचे जोरदार वारे वाहताना पहायला मिळत होते. मात्र, ब्रिटनच्या मतदारांनी डाव्या विचारसरणीस जवळ करणा–या मजूर पक्षाला भरभरून पसंती दिली, हे ही या निवडणूक निकालाचे आणखी एक वैशिष्ट्य ठरले आहे. विजयानंतर प्रतिक्रिया देताना स्टार्मर यांनी ब्रिटनमध्ये आशेचा सूर्यकिरण चमकत असून परिवर्तनाला सुरुवात झाल्याचे म्हटले आहे. ते आता हा ऐतिहासिक विजय कसा पेलतात आणि मतदारांच्या आशा–अपेक्षांची पूर्तता कशी करतात याची ब्रिटिश नागरिकांसह संपूर्ण युरोपला प्रतीक्षा असेल. स्टार्मर यांच्याकडे करिष्मा नसल्याची टीका होत होती. मात्र, त्यांनी ऐतिहासिक विजयाचा करिष्मा करून टीकाकारांची बोलती बंद केली आहे. पेशाने वकील असणा–या स्टार्मर यांनी हुजूर पक्षाच्या राजवटीत ब्रिटनच्या अर्थव्यवस्थेचा झालेला खेळखंडोबा अत्यंत आक्रमकपणे अधोरेखित करून तो मतदारांच्या मनात पुरता उतरवला. हुजूर पक्षातील नेतृत्वबदलाकडे लक्ष वेधून त्यांनी पक्षांतर्गत लाथाळ्यांकडे व त्यामुळे देशाच्या होत असलेल्या नुकसानाकडे मतदारांचे लक्ष वेधले. ब्रिटनच्या राजकारणात मजूर पक्षाला केंद्रस्थानी आणण्याची किमया स्टार्मर यांनी करून दाखविली. आता त्यांच्यावर ब्रिटनमध्ये बदल घडवून आणण्याची व सामान्यांच्या अपेक्षांची पूर्तता करण्याची मोठी जबाबदारी असेल. त्यांना अर्थव्यवस्थेला गती देण्यापासून देशातील निर्वासितांचे प्रश्न सोडविण्यापर्यंतचे अनेक संवेदनशील विषय आता हाताळावे लागणार आहेत व मतदारांनी त्यांच्यावर टाकलेला विश्वास सार्थ ठरवावा लागणार आहे.

सुनक यांनाही याच समस्यांसह पंतप्रधानपद स्वीकारावे लागले होते. या आव्हानांचा सामना करण्याचा त्यांनी आपल्या परीने पूर्ण प्रयत्नही केला पण त्यात त्यांना यश आले नाही. त्यामागे त्यांना त्यांच्याच पक्षातून पुरेसे समर्थन नसणे हे प्रमुख कारण होते. त्यांच्या अगोदरच्या पक्षनेतृत्वाने केलेल्या भोंगळ कारभाराचा फटका सुनक यांना सोसावा लागला. आजवर ब्रिटनच्या राजकीय क्षेत्रात हुजूर व मजूर या दोन प्रमुख पक्षांचे प्राबल्य राहिले आहे. मात्र, आता इतर पक्षांनीही आपली पाळेमुळे रुजवायला सुरुवात केली आहेत, हे या निवडणूक निकालातून स्पष्ट होते आहे. लिबरल डेमॉक्रॅटिक पक्षाने मिळविलेले या निवडणुकीतील यश हे त्याचे ठळक उदाहरण! या ऐतिहासिक सत्तांतराचा भारत–ब्रिटन संबंधावर काय परिणाम होणार, असा प्रश्न भारतीयांच्या मनात निर्माण होणे साहजिकच आहे व याची स्टार्मर यांनाही पुरती जाणीव असावी त्यामुळेच त्यांनी आपल्या पक्षाची पूर्वीची 'भारतविरोधी' ही प्रतिमा पुसण्याचा प्रयत्न आपल्या प्रचारात जाणीवपूर्वक केलेला दिसतो. त्याचे ठळक उदाहरण म्हणजे मजूर पक्षाने २०१९ मध्ये काश्मीरमध्ये पर्यवेक्षक पाठविण्याचा जो प्रस्ताव मंजूर केला होता तो स्टार्मर यांनी रद्द केला असून काश्मीर भारताचा अविभाज्य भाग असल्याचे मान्य केले आहे. भारतीय विद्यार्थ्यांसाठीची सुनक यांनी लावलेली व्हिसाबंदी उठवण्याचे आश्वासन स्टार्मर यांनी दिले आहे. भारतासोबत लवकरच मुक्त व्यापार करार करण्याची घोषणा त्यांनी केली आहे. तसेच भारतीय आयटी व मेडिको व्यावसायिकांना ब्रिटनमध्ये विशेष दर्जा देण्याची घोषणाही स्टार्मर यांनी अगोदरच केली आहे. त्यामुळे स्टार्मर यांना भारतासोबतच्या चांगल्या संबंधाचे राजकीय व आर्थिक तसेच जागतिक महत्त्व नक्कीच उमजलेले असल्याचे मान्य करायला हरकत नाही. त्यामुळे मजूर पक्षाच्या कार्यकाळातही भारत–ब्रिटन संबंध वृद्धिंगत होतील, ही आशा करण्यास काहीच हरकत नाही, हे निश्चित!

# ९४ हजार कोटींच्या पुरवणी मागण्या चर्चेविना मंजूर?

## विरोधकांचा शिंदे सरकारवर गंभीर आरोप; महाराष्ट्रात आर्थिक गोंधळ निर्माण करणारी परिस्थिती



**मुंबई । प्रतिनिधी**

**आजच्या पुरवणी मागण्या अवैध मार्गाने मान्य केलेल्या आहेत. ६ लाख ७० हजार कोटींचे एक बजेट मांडून, दुसऱ्या मिनिटाला ९४ हजार कोटींच्या पुरवणी मागण्या मांडल्या. ही महाराष्ट्रात आर्थिक गोंधळ निर्माण करणारी प्रवृत्ती आहे, असे म्हणत जयंत पाटील यांनी आपली नाराजी व्यक्त केली.**

महाराष्ट्र सरकारने विधानसभेत तब्बल ९४ हजार कोटींच्या पुरवणी मागण्या चर्चेविना मंजूर केल्याचा आरोप विरोधकांकडून करण्यात येतोय. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील आणि आमदार जितेंद्र आव्हाड यांनी हा आरोप केला आहे. ९४ हजार कोटींच्या पुरवणी मागण्या एका शब्दाचीही चर्चा न करता मंजूर करण्यात आल्या, असा आरोप जयंत पाटील यांनी केला आहे. जयंत पाटील यांनी या मुद्द्यावरुन चांगलाच संताप व्यक्त केला. सभागृहात सत्तारूढ पक्षाने गोंधळ घातला आणि सभागृह तहकूब करत महाराष्ट्राच्या माथ्यावर ९४ हजार कोटींचा नवा भुर्दंड मारला आहे. या पुरवणी मागण्यांना विरोधीपक्ष नाकारतील याची खात्री असल्याने हा पळपुटेपणा सरकारने केला आहे, अशी टीका जयंत पाटील यांनी केली. आजच्या पुरवणी मागण्या अवैध मार्गाने मान्य केलेल्या आहेत. ६ लाख ७० हजार कोटींचे एक बजेट मांडून, दुसऱ्या मिनिटाला ९४ हजार कोटींच्या पुरवणी मागण्या मांडल्या. ही महाराष्ट्रात आर्थिक गोंधळ निर्माण करणारी प्रवृत्ती आहे, असे म्हणत जयंत पाटील यांनी आपली नाराजी व्यक्त केली.

### जयंत पाटील काय म्हणाले?

काल सर्वपक्षीय बैठक बोलावण्यात आली होती. यापूर्वीही दोन बैठका झाल्या होत्या. महाविकास आघाडीच्या सर्व घटक पक्षांनी वारंवार भूमिका स्पष्ट केली होती. काल आरक्षणाच्या मथळ्याखाली बैठक बोलावण्यात आली होती. विधानपरिषद आणि विधानसभेतील विरोधी पक्षांना विश्वासात घेऊन एकमताने या बैठका घेणे अपेक्षित होते. तर त्याला योग्य स्वरूप आले असते. मात्र त्यांनी कोणतीही चर्चा केली नाही. सरकारने मराठा आणि ओबीसी समाजातील घटकांशी चर्चा केली. त्यांनी याबतीत काहीतरी निर्णय घेतला पाहिजे. ठोस निर्णय न घेता, विरोधी पक्ष बैठकीला आला नाही याचा कांगावा करण्यात काहीच अर्थ नाही. तुमच्याकडे २०६ आमदारांचे बहुमत आहे. त्यामुळे सभागृह चालवताना घाबरण्याचे काही कारण नाही, असेदेखील जयंत पाटील म्हणाले.

### जितेंद्र आव्हाड काय म्हणाले?

सरकारने खिशात काही नसतांना ९४ हजार कोटी रुपयांच्या पुरवण्या मागण्या मंजूर केल्या, असा दावा जितेंद्र आव्हाड यांनी केला.

# दुसऱ्या अन् तिसऱ्या पसंतीची मते कशी, कोणाला द्यायची?

## आमदारांना ट्रेनिंग, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा मास्टर प्लान

**मुंबई । प्रतिनिधी**

**१२ जुलैला विधानपरिषदेची निवडणूक होणार आहे. ११ जागांसाठी १२ उमेदवार रिंगणात असल्याने ही निवडणूक अधिक चुरशीची झाली आहे. विधान परिषद निवडणुकीत महायुतीच्या सर्व ९ उमेदवारांना निवडून आणण्याची सूत्रे मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंकडे असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. तसेच दुसऱ्या आणि तिसऱ्या पसंतीची मते कशी आणि कोणाला द्यायची याची माहिती देण्यासाठी आमदारांचा वर्ग मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घेतला आहे.**



विधान परीषद निवडणुकीत महाविकास आघाडीला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे दे धक्का देण्याच्या तयारीत आहेत. यासाठी त्यांनी मास्टर प्लान तयार केल्याची माहिती मिळत आहे. महायुतीचे सर्व ९ उमेदवार विजयी करण्यासाठी प्रत्येक उमेदवाराला पहिल्या पसंतीचे निर्णायक मत, त्यानंतर दुसऱ्या आणि तिसऱ्या पसंतीची मतं कशी आणि कोणाला द्यायची...? याची सांख्यिकी रणनिती मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ठरवली आहे, अशी माहिती सूत्रांनी दिली. शिवसेना, भाजपा आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षासह सर्व घटक पक्ष आणि समर्थक अपक्ष आमदारांची एकत्र मोट बांधली महायुतीमधील शिवसेना, भाजपा आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षासह सर्व घटक पक्ष आणि समर्थक अपक्ष आमदारांची एकत्र मोट मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी बांधली. महायुतीमधील तीन प्रमुख पक्षांच्या अंतर्गत बैठका पार पडल्यानंतर सर्व मतदार आमदारांचे विजयी गणित मांडण्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आक्रमक चाली रचल्या आहेत. वरिष्ठ सूत्रांनी दिलेल्या माहीती नुसार महायुतीमधील पक्ष, घटक पक्ष आणि समर्थक अपक्ष आमदारांशी स्व:ता मुख्यमंत्री एकनाथ शिंदे संपर्क ठेवून आहेत. महायुतीचे सर्व ९ उमेदवार विजयी करण्यासाठी प्रत्येक उमेदवाराला पहिल्या पसंतीचे निर्णायक मतं त्यानंतर दुसऱ्या आणि तीसऱ्या पसंतीची मतं कशी आणि कोणाला द्यायची याची सांख्यिकी रणनिती मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ठरवली आहे.

# अशोक पाखरे व रमेश जाधव 'पँथर रत्न' पुरस्काराने सन्मानित

**मानूर । प्रतिनिधी**

**मानूरचे नाव पुन्हा एकदा राज्य पातळीवर झळकले. निमित्त होते शोषितांचा लढा उभारणाऱ्या दलित पँथर या संघटनेचा ५२ वा वर्धापन दिनानिमित्त व केंद्रीय राज्यमंत्री (विमान व नागरी सेवा) श्री मुरलीधर मोहोळ यांच्या नागरी सत्काराचे. या ५२ व्या वर्धापनानिमित्त महाराष्ट्र राज्यातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या ५२ महत्वाच्या व्यक्तींचा सन्मान सोहळा आयोजित केला होता.**

यात प्रामुख्याने मानूरचे धडाडीचे आणि अतिशय तरुण असे लोकप्रिय लोकनियुक्त सरपंच श्री अशोक (मामा) पाखरे यांनी मागील अवघ्या दोन वर्षाच्या कारकिर्दीतच गावातील महत्वाची विकासाची कामे अविरतपणे पूर्ण केली. यात प्रामुख्याने गावातील नागरिकांचा पिण्याच्या पाण्याचा मोठा प्रश्न होता, त्यासाठी केंद्राची महत्वाकांक्षी राष्ट्रीय जल जीवन योजना निरपेक्षपणे राबवून कालातीत हा प्रश्न कायमचा निकाली लावला. त्याच बरोबर गावातील सर्वच विद्युत खांबावर फोकस, हायमास्ट तसेच दलित वस्तीवर अक्षय सौर प्रकाश योजना आणून प्रत्येक घराजवळचा सर्वच परिसर उजळून काढला, तसेच घन कचरा, रस्ते, गाव स्वच्छता, सार्वजनिक स्वच्छतागृहे, पिण्याच्या पाण्यासाठी कुप नलिका खोदाई , याशिवाय मागेल त्याला विहीर, गाय गोठा, व शेत तळे दिले.

# पालकमंत्री धनंजय मुंडे यांच्या प्रयत्नातून जिल्ह्याला भरघोस खत साठा उपलब्ध

**बीड । प्रतिनिधी**

**जिल्ह्यासाठी उपलब्ध करून ठेवण्यात आलेल्या खताच्या साठ्यातील ७० टक्के म्हणजेच ४०४५ मे. टन युरिया व १३०४ मे. डीएपी खताचा साठा खुला करण्याचा निर्णय आज जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांच्या अध्यक्षतेत झालेल्या एका बैठकीत घेण्यात आला. पालकमंत्री तथा राज्याचे कृषिमंत्री धनंजय मुंडे यांच्या प्रयत्नातून यांना जिल्ह्याला ३ पटीहून अधिक युरिया बफर साठा प्राप्त झाला आहे. सोबत डीएपी खताची देखील उपलब्धता वाढलेली आहे.**




गेल्या खरीप हंगामासाठी जिल्ह्याला १६६५ मे. टन युरिया प्राप्त झाला होता तो यंदा प्रयत्नामुळे ५७५० मे. टन इतका झाला आहे. सोबतच डीएपी खताचा बफर साठा १२०४ मे. होता तो या खरिप हंगामासाठी १२१० मे. टन झाला आहे. नंदा जिल्ह्यात चांगला पाऊस होत असल्याने या खतांचा शेतकऱ्यांना उत्पन्न वाढीसाठी मोठ्या प्रमाणावर फायदा होणार आहे. जिल्हाधिकारी अविनाश पथक यांचे अध्यक्षतेत बफर साठ्याबत बैठक आज संपन्न झाली. त्यात एकूण बफर पैकी ७० टक्के साठा खुला करण्याचा निर्णय झाला. सभेस सदस्य सचिव तथा जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी जेजुरकर स्वामी, विक्रेते संघटना अध्यक्ष अंगद नवले. जिल्हा प्रतिनिधी, जिल्हा पणन अधिकारी, आरसीएफ व इतर क प्रतिनिधी, तसेच गरंडे कल्याण अंबुरें, सर्व उप विभागीय कृषी अधिकारी उपस्थिती होते. यंदाच्या वाढीव बफर साठ्यानुसार त्यातून विविध कंपन्यांकडून खत उपलब्ध झाले आहे. यासाठी पूर्वीची महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळ व नव्याने जिल्हा पणन अधिकारी या नोडल एजन्सी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांनी अनुक्रमे ४०४५ व १३०४ मे टन युरिया तर ८५५ मे टन व १७४ मे टन बफर साठा करून ठेवला आहे. आजचे बैठकीत खुला करण्यात आलेल्या साठ्याचे परिमाण साधारणतः ३७५० मे टन युरिया व ७२० मे टन डीएपी असा एकूण ४२७० मे टन साठा खुला करण्यात येईल. म्हणजे साधारण दोन रेल्वे रेक तथा ४२७ ट्रक साठा जिल्ह्यातील विविध भागात वितरित होईल. गरजेनुसार पुढील टप्प्यात साधारण १८० ट्रक खताचा बफर साठा खुला करण्यात येईल. याबाबत सविस्तर आदेश व सूचना दोन दिवसात तालुका स्तरीय अधिकारी व नोडल एजन्सी यांना निर्गमित होतील. खत विक्री करण्यासाठी परवाना प्राप्त शेतकरी उत्पादक कंपन्या याना प्राधान्य देण्यात येईल. बफर साठा वितरणाचे अधिकार तालुका समितीस देण्यात आलेले आहेत. तरी ज्या कृषी सेवा केंद्र/ शेतकरी उत्पादक कंपन्या याना बफर साठ्यातील युरिया व डीएपी हवा आहे, त्यांनी त्यांची मागणी तालुक्याचे कृषी अधिकारी पंचायत समिती व तालुका कृषी अधिकारी यांचे संयुक्त समितीशी संपर्क करावा. आवाहन कृषी विभागातर्फे करण्यात आले आहे.

## पान १वरून...

### पीएम किसानचे शेतकऱ्यांना

कर कपातीसह कर्ज माफीची अपेक्षा आहे. अनेक अल्पभूधारक शेतकऱ्यांना पीएम किसान योजनेचा हप्ता वाढविण्याची अपेक्षा आहे. पीएम किसान सन्मान निधी योजनेचा हप्ता वाढविण्यात येऊ शकतो. सध्या त्यांना वार्षिक ६००० रुपये हप्ता मिळतो. तो वाढवून सरकार १०,००० रुपये करण्याच्या विचारात आहे. सध्या तीन हप्त्यात ही रक्कम देण्यात येते. सरकार चार हप्त्यात रक्कम देऊ शकते.

**स्वस्त दराने कर्ज द्यावे**

शेतकऱ्यांना स्वस्त दराने कर्ज देण्यासाठी सरकारने एक स्वतंत्र एजन्सी नेमावी. त्यामाध्यमातून योग्य आणि पात्र शेतकऱ्यांना स्वस्त दराने कर्ज द्यावे. त्यासाठी डीबीटी माध्यमाचा वापर करावा अशी मागणी पण जोर धरत आहे. काही विकास कार्यक्रमासाठी शेतकऱ्यांची निवड करावी. त्यांना प्रशिक्षण द्यावा अशी मागणी करण्यात येत आहे. सध्याच्या ज्या काही शेतकरी विकास संस्था, बँका आहेत, त्यांचा शेतकऱ्यांना किती फायदा होतो, याची समीक्षा करण्याची मागणी होत आहे. तर एक मध्यस्थ नोडल संस्था उभारण्याची मागणी शेतकरी वर्ग करत आहे.

--------------

### ते कधीही मराठ्यांच्या मोर्चात दिसल

पाठ फिरवल्यानंतर राधाकृष्ण विखेपाटील यांनी सभागृहातून नाव न घेता थेट शरद पवारांवर हल्लाबोल केला. लोकांना झुलवत ठेवणे हे षडयंत्र आहे. चारवेळा मुख्यमंत्री राहिलेल्या नेत्याने कधी मराठा आरक्षणावर ब्र काढला नाही. कधी मोर्चात दिसले नाहीत, असे म्हणत शरद पवार हे मराठा आरक्षणावरही कधीही भाष्य करत नाहीत, असे विखे पाटील यांनी म्हटले. पुढे बोलताना राधाकृष्ण विखे पाटील म्हणाले की, अध्यक्ष महोदय, खरं म्हणजे चार वेळा मुख्यमंत्री राहिलेल्या नेत्याने आज मराठा समाजाच्या आरक्षणाबद्दल कधी ब्र शब्द काढला नाही, कधी ते मराठा समाजाच्या मोर्चात दिसले नाहीत, मराठ्यांच्याबद्दल कधी सकारात्मक भूमिका घेतली नाही. खरं म्हणजे यापूर्वी सरकारने दिलेलं मराठा आरक्षण सुप्रीम कोर्टात टिकलं नाही. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे २०१४ मध्ये मुख्यमंत्री झाल्यानंतर त्यांनी मराठा आरक्षणाच्या विधेयकाचं कायद्यात रुपांतर केले. सर्वोच्च न्यायालयात ते आरक्षण टिकलं. पण महाविकास आघाडीच्या काळात त्यांचे मुख्यमंत्री फक्त फेसबुकवर होते. त्यामुळे ते आरक्षण गेले, असे राधाकृष्ण विखे पाटील यांनी म्हटले. तसेच, उपोषणकर्ते मनोज जरांगे पाटील यांनाही त्यांनी आवाहन केलं आहे.

-------------

### मराठा आरक्षणप्रश्नी सरकारने भूमिका

यातून सक्षम तोडगा काय तो समोर आणावा अशी प्रतिक्रिया खासदार अमोल कोल्हे यांनी दिली. मागेच मराठा आरक्षणा बाबत मुख्यमंत्री यांचा व्हिडीओ समोर आला होता. आपण काय बोलायचे आणि निघून जायचे यामध्ये त्यांची काय भूमिका आहे? हे समजणे गरजचे असून सर्व घटकांना योग्य न्याय मिळेल असा तोडगा सरकारने काढणे गरजेचे असल्याचे ते म्हणाले.

------------

### मराठा आरक्षणावरील

मुदतवाढ आयोगाला देण्यात आली आहे. तर, ५ ऑगस्टपासून पुढील सुनावणी होणार आहे. महाराष्ट्रातील सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गीय श्रेणीतील मराठ्यांच्या नोकऱ्या अन्? शिक्षणातील १० टक्के कोट्याच्या आव्हानावर मुंबई उच्च न्यायालयात आज पुन्हा सुनावणी पार पडली. मराठा आरक्षणाला स्थगिती देण्याची मागणी करणाऱ्या याचिकांवर सध्या न्यायालयात सुनावणी सुरू आहे. त्यावर, आज न्यायालयाने याचिकाकर्ते व राज्य सरकार यांना महत्त्वाचे निर्देश दिले असून पुढील सुनावणी ऑगस्ट महिन्यापर्यंत तहकूब केली आहे. त्यामुळे, आता, ५ ऑगस्टपासून पुढील नियमित सुनावणी सुरू होणार आहे.

मराठा आरक्षणाबाबत प्रतिज्ञापत्र सादर करण्यासाठी मागास आयोगाला आणखी मुदतवाढ हवी आहे. आयोगाचे वकील सध्या परदेशात असल्याने आयोगाच्यावतीने कोर्टाकडे याबाबत विनंती करण्यात आली होती. त्यानंतर, तीन आठवड्यांत राज्य मागासवर्ग आयोगाने आपली भूमिका स्पष्ट करावी, असे निर्देश न्यायालयाने दिले आहेत. त्यामुळे, पुढील तीन आठवड्यापर्यंत राज्य मागासवर्गीय आयोगाला मुदतवाढ मिळाल्याचे दिसून येते. तर, आयोगाने मांडलेल्या भूमिकेवरील प्रतिज्ञापत्रावर इतर सर्व प्रतिवाद्यांना १० दिवसांत उत्तर देण्याचे निर्देशही हायकोर्टाकडून देण्यात आले आहेत. त्यामुळे, आता ऑगस्टपर्यंत न्यायालयाने मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावर वादी व प्रतिवादींना म्हणणे मांडण्यास अवधी दिला आहे. त्यानंतर, न्यायालयाची नियमित सुनावणी सुरू होणार आहे.

----------

### एकही नोंद रद्द झाली तर

जरांगे पाटील यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे तथा शिंदे सरकारला दिला. मनोज जरांगे पाटील यांनी आज धाराशिवच्या सभेत मंत्री छगन भुजबळ आणि मंत्री गिरीश महाजन यांच्यावर निशाणा साधला. यावेळी त्यांनी आणखी एक महत्त्वाचे वक्तव्य केले. राष्ट्रवादी, काँग्रेस, शिवसेनेच्या श्रीमंत मराठ्यांना आरक्षण लागत नाही. त्यांच्या मुलांना आरक्षणाची गरज नाही, असे मोठे वक्तव्य मनोज जरांगे पाटील यांनी केले. राज्य सरकारने काल मराठा आरक्षणावर मार्ग काढण्यासाठी सर्वपक्षीय बैठक बोलावली होती. पण या बैठकीला महाविकास आघाडीने बहिष्कार टाकला होता. यावरुन त्यांनी संबंधित वक्तव्य केले आहे का? असा प्रश्न या निमित्ताने उपस्थित होत आहे.

-------------

### मनोज जरांगे आज बीडमध्ये:

शिक्षणाधिकारी प्राथमिक /माध्यमिक शिक्षण विभाग, जिल्हा परिषद, बीड यांना शालेय विद्यार्थ्यांना एकदिवसयीय सुट्टी जाहीर करावी असा विनंती अर्ज केला होता. अनिलदादा जगताप यांच्या विनंतीचा मान राखत शिक्षणाधिकारी प्राथमिक /माध्यमिक शिक्षण विभाग, जिल्हा परिषद, बीड यांनी दि. ११ जुलै २०२४ रोजी सर्व शाळांना सुट्टी जाहीर केल्याचे पत्रक प्रसिद्ध केले आहे. बीड शिक्षण विभागाच्या या सहकार्याबद्दल मराठा सेवक अनिल जगताप यांनी आभार मानले आहेत.

--------------

### टेन्शन संपले; बीटेक करणाऱ्यांसाठी

त्यांच्या आवडीची भाषा निवडू शकणार आहेत. दोन्ही भाषांमध्ये एकच शिक्षक शिकवणार आहेत. सत्रादरम्यान विद्यार्थ्यांना भाषेचे माध्यम बदलण्याचा पर्याय असणार आहे. असे असले तरी माध्यमांच्या विद्यार्थ्यांचे मूल्यमापन करताना कोणता भेदभाव केला जाणार नाही. दोन्ही भाषेत शिकणाऱ्यांना समान पातळीवर गुण दिले जाणार आहेत. शिक्षणात सातत्य आणि गुणवत्ता राखण्यासाठी, एकच प्रशिक्षक दोन्ही विभागांना शिकवणार आहे. आयआयटी जोधपूरमध्ये अधिक समावेशक आणि आश्वासक शैक्षणिक वातावरणाचा प्रचार करण्याच्या दिशेने हे एक महत्त्वाचे पाऊल ठरेल, असेही पुढे म्हटले आहे.

-----------

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
गुरुवार दि. ११ जुलै २०२४
३

## नगर परिषद मुख्याधिकारी निता अंधारे यांच्या हस्ते वृक्षारोपण

**बीड । प्रतिनिधी**

यंदाच्या उष्णतेच्या तीव्रतेने अनेक वर्षांचा विक्रम मोडीत काढला असून वेळीच उपाययोजना न केल्यास येत्या काही दिवसांत उन्हाचा तडाखा आणखी वाढेल, असे पर्यावरण तज्ज्ञांचे म्हणणे आहे.पर्यावरणाचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत चालला आहे. त्यामुळे मानवाचे अस्तित्व धोक्यात आले आहे.

जमात-ए-इस्लामी हिंद महाराष्ट्रने २० जून ते ०५ जुलै २०२४ या कालावधीत स्थानिक स्वराज्य संस्था, स्वयंसेवी संस्थांसोबत पर्यावरण रक्षणासाठी जनजागृती आणि पर्यावरण रक्षणासाठी व्यावहारिक उपाययोजना यासाठी पंधरवड्याचे आयोजन केले . या अनुषंगाने जमात-ए-इस्लामी हिंद बीडच्या वतीने विविध कार्यक्रम आणि उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे . शहरातील मोहम्मद अली रोडवर जमात ए इस्लामी बीडचे शहराध्यक्ष जावेद अली खान यांच्या नेतृत्व व मार्गदर्शनाखाली नगर परिषद सदस्य सय्यद फारुख अली पटेल व जमात-ए-इस्लामी बीड यांच्या संयुक्त विद्यमाने नगर परिषद सीओ मा. नीता अंधारे यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले .यावेळी नगरपालिकेचे गटनेते फारूक पटेल, स्थानिक सचिव शेख मोईजुद्दीन, मोहीम निमंत्रक डॉ.सिराज खान आरजू, डॉ. आमिर अली, अलीम पटेल, शेख गयासुद्दीन सर, शेख परवेज, शेख अयुब, रौफ जनाब., तौसीकअल्मास आदी उपस्थित होते.

# पाटोदा तालुक्यात सर्वाधिक पाऊस तर वडवणी तालुक्याकडे पावसाने पाठ फिरवली

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील पाटोदा आणि आष्टी या दोन तालुक्यांमध्ये आतापर्यंत झालेल्या पावसाच्या सरासरीमध्ये सर्वाधिक पाऊस पडला असून सर्वात कमी पाऊस हा वडवणी तालुक्यात पडलेला आहे. पाटोदा तालुक्यामध्ये जवळपास ३१७.४ मिलिमीटर म्हणजे ५८.९% पाऊस पडला तर आष्टी तालुक्यामध्ये २८७.५ मिलिमीटर म्हणजे ५२.६% पाऊस पडला. तर वडवणी तालुक्यात १७१.२ मिलिमीटर म्हणजे २८.५% एवढा कमी पाऊस पडला .आतापर्यंत झालेल्या पावसाच्या एकूण सरासरी मध्ये जिल्ह्यात ४५.१% पाऊस पडला असून तो २५५.४ मिलिमीटर एवढा आहे.

बीड जिल्ह्यामध्ये मागच्या वर्षी काही भागात कमी पाऊस पडल्याने पाण्याचा प्रश्न गंभीर झाला होता .मात्र यावर्षी सुरुवातीला जिल्ह्यात बऱ्यापैकी पाऊस पडल्याने शेतकऱ्यांच्या आशा पल्लवी झाल्या तर पिण्याचा पाण्याचा प्रश्न सुटेल अशी आशा सर्वसामान्य माणसाला वाटत आहे .आतापर्यंत बीड तालुक्यामधील पाटोदा तालुक्यात ३१७.४ मिलिमीटर म्हणजे ५८.९% एवढा पाऊस झाला आहे. हा पाऊस जिल्ह्यात सर्वाधिक सरासरी चा पाऊस आहे. त्या खालोखाल आष्टी तालुक्यामध्ये २८७.५ मिलिमीटर पाऊस झाला ही सरासरी ५२.६% एवढी आहे .बीड तालुक्यामध्ये २३४.६ मिलिमीटर म्हणजे ३९.५% एवढा पाऊस झाला. गेवराई तालुक्यात २७६.२ मिलिमीटर म्हणजे ४७.१% ,माजलगाव मध्ये २४४.१ मिलिमीटर म्हणजे ३९.६%,



अंबाजोगाई तालुक्यात २८२.७ मिलिमीटर म्हणजे ४४.७%, केज तालुक्यात २३७.७% म्हणजे ४०.७% , परळी तालुक्यामध्ये २२६.८ मिलिमीटर म्हणजे ३६.१%, धारूर तालुक्यात २१५ मिलिमीटर म्हणजे ३२.१ %, वडवणी तालुक्यात १७१.२ मिलिमीटर म्हणजे २८.५% तर शिरूर तालुक्यामध्ये आतापर्यंत २७२.४ मिलिमीटर म्हणजे ५२.८% एवढा पाऊस झाला. जिल्ह्यामध्ये या मोसमात २५५.४ मिलिमीटर एवढा पाऊस झाला आहे. जिल्ह्याची एकुण पावसाची सरासरी ५६६.१ अपेक्षित आहे. काल संपलेल्या २४ तासांमध्ये आष्टी आणि पाटोद्यामध्ये सर्वाधिक पाऊस झाला. यात पाटोदा तालुक्यात ८ मिलिमीटर तर आष्टीत ६.५ मीटर एवढा पाऊस झाला. याशिवाय बीड ०.२ मी.मी.,गेवराई २.३ मिलीमीटर ,माजलगाव ०.१ मिलिमीटर ,अंबाजोगाई ०.१ मिलिमीटर, परळी ०.२ मिलिमीटर, धारूर ०.८ मिलीमिटर, शिरूर कासार ०.३ मिलीमीटर तर वडवणी आणि केज तालुक्यात कुठलीही पावसाची नोंद झाली नाही.मागील २४ तासांमध्ये जिल्ह्यात सरासरी १.७ मिलिमीटर एवढा पाऊस झाला. आणखी जिल्ह्याला पावसाची गरज असून काही भागात अद्याप पाऊस झालेला नाही. आगामी काळात या भागात पाऊस पडेल अशी अपेक्षा शेतकऱ्यांना आहे.

## मराठा आरक्षण जनजागृती, शांतता रॅलीस उपस्थित रहा -बळीराम गवते

**बीड । प्रतिनिधी**

मराठा संघर्ष योध्दा मनोज जरांगे पाटील यांच्या उपस्थितीत बीड येथे दि.११ जुलै रोजी मराठा आरक्षण जनजागृती व शांतता रॅलीचे आयोजन करण्यात आलेले असून या रॅलीस समस्त मराठा बांधवांनी उपस्थित रहावे, असे अवाहन बळीराम गवते यांनी केले आहे.



मागील दहा महिन्यांपासून मराठा आरक्षणासाठी मराठा योध्दा मनोज जरांगे पाटील लढा देत आहेत. आजवर अनेक उपोषणे केलेली असून सरकारने दि.१३ जुलै रोजी मराठा आरक्षणातील सगेसोयरे अद्यादेशाची अमलबजावणी करण्यासाठी वेळ मागीतलेली आहे. यासाठी शासन स्तरावर प्रयत्न सुरू आहेत. दरम्यान, मराठवाड्यात मनोज जरांगे पाटील यांच्या उपस्थितीत मराठा आरक्षण जनजागृती आणि शांतता रॅली काढण्यात येत आहेत.हिंगोली, परभणी, नांदेड, लातूर याठिकाणी मराठा बांधवांनी प्रचंड मोठ्या प्रमाणात उपस्थिती दर्शवलेली आहे. बीडमध्ये दि.११ रोजी मराठा योध्दा मनोज जरांगे पाटील बीडमध्ये येत आहेत. पाटील हे मुळचे बीड जिल्ह्यातील असल्याने याठिकाणी सर्व जिल्ह्यांचे रेकॉर्ड ब्रेक रॅली होणार आहे. रॅलीच्या तयारीसाठी मागील काही दिवसांपासून सर्व मराठा बांधव तन-मन-धनाने प्रयत्न करत आहेत. ही रॅली प्रचंड होणार असून बीड जिल्ह्यातून येणाऱ्या विविध तालुक्यातील वाहनांसाठी वेगवेगळ्या ठिकाणी पार्कीगची व्यवस्था केलेली आहे. सर्व बांधवांनी गावातून येताना शांततेत यावे, कोणीही गाड्या ओव्हरटेक करण्याचा प्रयत्न करू नये. सदरील रॅली भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यापासून निघून सुभाष रोड मार्गे लोकशाहिर, साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौकात येईल. त्याठिकाणी मनोज जरांगे पाटील हे उपस्थितांना संबाधित करतील. तरी या रॅलीस सर्व बांधवांनी उपस्थित रहावे, असे अवाहन बळीराम गवते यांनी केले आहे.

## आदिवासी कोळी जमातीचे जात प्रमाणपत्र तात्काळ देण्यासाठी कोळी राष्ट्रसंघाचे निवेदन

अंबाजोगाई । प्रतिनिधी

''मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उप मुख्यमंत्री अजित पवार, उप मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना मंत्रालय टपाल द्वारे निवेदन देण्यात आले'' समक्ष भेट घेऊन आदिवासी विकास विभागाचे प्रधान सचिव यांच्याशी आदिवासी कौशल्य विकास उद्योजकता निधी विविध योजना संदर्भात चर्चा करण्यात आली'' त्यावेळी छ. संभाजीनगर चे खासदार मा. संदिपान भुमरे यांच्याशी चर्चा करून आदिवासी पडताळणी समिती (छ. संभाजीनगर विभाग प्रमुख) संगीता चौहान मॅडम यांच्याशी खा. भुमरे साहेब यांनी दूरध्वनीवरून संपर्क साधुन चर्चा केली व लवकरात लवकर प्रश्न मार्गी लावावे असे सांगितले, तुळजापूर चे आमदार मा. राणा जगजितसिंह पाटील, वरुड मोर्शी चे आमदार मा. देवेंद्र भुयार, बुलढाणा चे आमदार मा. संजय



गायकवाड यांच्याशी जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र सुलभ रित्या देण्यात यावे या विषयावर चर्चा करून निवेदन मंत्रालय, मुंबई राष्ट्रसंघ चे संस्थापक अध्यक्ष मा. गोकुळ दादा कोळी, महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष मा.श्री बळीराजे वाघमारे, पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष मा. हानमंत दादा जमादार, कोळी राष्ट्रसंघ चे नेते मा. जनक भाऊ तपसे, कोळी राष्ट्रसंघ चे नेते मा. रघुराम टोंपे सर यांच्या हस्ते देण्यात आले. त्यावेळी मिडीयाच्या माध्यमातून गोकुळ दादा कोळी व बळीराजे वाघमारे यांनी संवाद साधला असता दोन वेळा राज्य शासनाने अनुसूचित जमातीची बैठक आयोजित करण्यात आलेली दोन वेळा विविध कारणे देऊन रद्द करण्यात आली जाणुन बुजून हे सर्व सामान्य गरीब समाजाची पिळवणूक करत आहेत पाचशे कि.मी अंतरावर आलेली कोळी जमातीचे शेकडो लोकांना आले तसे परत जावे लागले आम्ही सुद्धा माणसे च आहोत माणूस म्हणून प्रशासनाने आमच्याकडे बघावे आमचा अंत पाहू नका आम्ही सुद्धा मतदार आहोत हे विसरू नका असे परखड मत कोळी राष्ट्रसंघ चे प्रदेश अध्यक्ष बळीराजे वाघमारे यांनी व्यक्त केले.

## एमपीएससीमध्ये दोन वेळेस अपयश पचवून तिसऱ्या प्रयत्नात होळच्या शेतमजुराचा मुलगा झाला मंत्रालयात साहेब

मस्साजोग । प्रतिनिधी

घरातील आठराविश्व दारीद्रय असतांना गरिब परिस्थितीचा सामना करत होळ .ता केज जि. बीड येथील शेतमजूरांचा मुलगा सुंदर आशा हनुमंत कसबे याने मनात जिद्द ठेवून ,रात्र दिवस अभ्यास करून मेहनतीच्या जोरावर वयाच्या २५ व्या वर्षी यश संपादन करून मंत्रालयात साहेब होण्याचा बहुमान मिळवला आहे . महाराष्ट्र लोकसेवा अयोग सेवा गट - ब - मार्फत विविध पदासाठी घेण्यात आलेल्या नोंव्हेबर वर्ष २०२३ रोजीच्या परिक्षेत मंत्रालय सहाय्यक कक्ष अधिकारी म्हणून निवड झालेल्या सुंदर कसबेचा मित्रांकडून सावित्रीबाई फुले विद्यापीठाच्या संज्ञापन व वृत्तपत्र विद्या विभागाच्या प्रांगणात सामनाचे पत्रकार नवनाथ शिंदे ,अनंत जाधव , अजय देशमुख ,ऋषिकेश सानप ,व्याकटेश ढाकणे यांच्या हस्ते मिठाई भरवत आणि भेटवस्तू देऊन सत्कार करून आनंद उत्सव साजरा करण्यात आला.

श्यामसुंदर यांचे पहिली ते दहावी पर्यतचे शिक्षण स्वामी विवेकानंद विद्यालय होळ येथे पूर्ण झाले. अकरावी ते बारावी पर्यंतचे शिक्षण योगेश्वरी महाविद्यालय अंबाजोगाई येथे पूर्ण झाले. बारावी नंतर पदवीचे शिक्षण मॉडर्न महाविद्यालय शिवाजीनगर ,पुणे येथे कला शाखेत पूर्ण केले. अन पुढे स्पर्धा परिक्षा करण्याचे ठरवले. घरातील आठराविश्व दारीद्रय परिस्थिती अनुकूल असल्यामुळे दुसर्याच्या शेतात मोलमजुरी केल्या शिवाय घरची चुल पेटत नव्हती आई ,वडील भाऊ व बहीण अशा कसबे कुटुंबाने जिवन जगण्याचा संघर्ष केला,घरची परिस्थिती अनुकूल , बेताची असल्यामुळे लहानपणापासुनच मनात जिद्द आणि अधिकारी होण्याच स्वप्न बाळगल्याने पुणे येथे शिक्षण घेत असतांना कमवा आणि शिका या योजनेमध्ये काम केले.अभ्यास करताना खूप अडचनिचा सामना करावा लागत होता.परंतु मोठा भाऊ चंद्रसेन( भारतीय सैन्य दलांत कार्यरत असल्याने )श्यामसुंदरच्या खाद्यांवरचे बाकी अडचनीचे ओझे कमी झाले त्यामुळे सुंदरचा अभ्यासाचा मार्ग मोकळा झाला. आई वडील यांनी गावी दुसऱ्याच्या शेतात मोलमजुरी करून सुंदरला शिक्षणासाठी पैसा पुरवला . आभ्यासातील




सातत्य ठेवत जिद्द, चिकाटी आणि मेहनतीच्या जोरावर शिका ,संघटित व्हा आणि संघर्ष करा '' ह्या भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या विचाराने प्रेरित होऊन महाराष्ट्र लोकसेवा अयोग सेवा गट -ब - मार्फत विविध पदासाठी घेण्यात आलेल्या एप्रिल २०२३ रोजी प्री आणि नोव्हेबर वर्ष २०२३ मेन्स या दोन्ही परिक्षेत सुंदर कसबे याने दोन वेळेस अपयश पचवून तिसऱ्या प्रयत्नात दिनांक ५ जूलै शुक्रवार रोजी लागलेल्या महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचा गट -ब परिक्षेचा निकाल जाहीर झाला त्यात घवघवीत यश मिळवले आहे. त्यामुळे सुंदरचे गावातील ग्रामस्थांकडून राज्यभरातील नातेवाईकांकडून , मित्रपरिवारांकडून कौतूक होत आहे.

## केंद्र शासनाचे टाक्स फोर्स व्दारकादास मंत्री बँकेत येणार, मंत्री बँकेची केली प्रशंसा

### रिझर्व बँकेच्या निर्बंधातून बाहेर पडण्यासाठी देशभरातील बँकांना मंत्री बँकेची होणार मदत-डॉ.आदित्य सारडा

**बीड प्रतिनिधी**

येथील द्वारकादास मंत्री बँकेवर रिझर्व बँकेने बँकिंग नियमन कायद्याचे कलम ३५ नुसार (निर्बंध) लावले होते. निर्बंध उठविण्यासाठी मंत्री बँकेने रिझर्व बँकेच्या नियमानुसार आवश्यक आर्थिक निकष, रेशो व



पर्याप्तता प्रमाण पूर्ण केल्याने रिझर्व बँकेने २६ फेब्रुवारी २०२४ रोजी मंत्री बँकेवरील सर्व निर्बंध हटवून सर्व व्यवहार सुरू करण्यास परवानगी दिली. याची दखल थेट केंद्र शासनाच्या सहकार मंत्रालयाने घेतली. सहकार मंत्रालयाने सहकारी बँकांच्या समस्या जाणून घेण्यासाठी, शासनास सल्ला देण्यासाठी आणि सहकारी बँकिंग क्षेत्राच्या परिवर्तनासाठी टास्क फोर्सची नियुक्त केलेली आहे. हे टास्क फोर्स आता द्वारकादास मंत्री नागरी सहकारी बँकेला भेट देऊन रिझर्व बँकेच्या निर्बंधातून मंत्री बँक बाहेर कशी पडली. यासाठी बँकेने कसे काम केले याची माहिती घेणार आहेत. त्यासाठी बँकेस सोयीस्कर वेळ आणि तारखेची मागणी टास्क फोर्सकडून केली असल्याची माहिती बँकेचे अध्यक्ष डॉ. आदित्य सुभाषचंद्रजी सारडा यांनी दिली.

बीड येथील द्वारकादास मंत्री नागरी सहकारी बँक लि., बीड वर रिझर्व बँकेने ९ मार्च २०२२ रोजी बँकिंग नियमन कायद्याचे कलम ३५ नुसार ( निर्बंध) लावून बँकेचे आर्थिक व्यवहारावर मर्यादा आणली होती. बँकेवर २४ सप्टेंबर २०२१ रोजी प्रशासकीय मंडळाची नियुक्ती केली होती. त्यानंतर सहकार खात्याने बँकेच्या संचालक मंडळाची निवडणूक घेतली व १३ जानेवारी २०२३ रोजी बँकेवर संचालक मंडळाची निवड झाली. या निवडणुकीत बँकेचे मार्गदर्शक सुभाषचंद्र सारडा यांचे चिरंजीव डॉ.आदित्य सारडा हे बँकेचे नवनिर्वाचित अध्यक्ष झाले. अध्यक्ष पदाची सुत्र हाती घेताच डॉ. आदित्य सारडा यांनी बँकेवरील आर्थिक निर्बंध कसे उठतील यावर तन मन लावून सचोटीने पूर्णपणे प्रयत्न केले. भारतीय रिझर्व बँकेच्या नियमानुसार सर्व निकषांची पूर्तता कशी होईल यावर काम केले. बँकेची थकीत कर्ज वसुली, भाग भांडवल वाढवणे यासह इतर आवश्यक बाबींवर लक्ष केंद्रीत करत बँक पूर्व पदावर आणण्यासाठी केलेल्या प्रयत्नाला २६ फेब्रुवारी २०२४ रोजी यश मिळाले. आणि रिझर्व बँकेच्या निर्बंधातून मंत्री बँक बाहेर निघाली. याची दखल केंद्र शासनाच्या सहकार मंत्रालयाकडून सहकारी बँकांची समस्या जाणून घेण्यासाठी, शासनास सल्ला देण्यासाठी आणि सहकारी बँकिंग क्षेत्राचे परिवर्तनासाठी नियुक्त केलेल्या टास्क फोर्स ने घेतली. याबाबत नॅशनल फेडरेशन ऑफ को-ऑपरेटिव अर्बन बँक मध्ये नियुक्त टास्क फोर्सचे मुख्य श्री. डी.कृष्णा यांनी ३ जुलै २०२४ रोजी बँकेस पत्र देऊन आपली बँक भारतीय रिझर्व बँकेचे ३५ चे निर्बंध () मधून बाहेर निघाली आहे. याबाबत आम्हास आनंद होत आहे. बँकेचा एआयडी निर्बंध लागल्यापासून एआयडी तून बाहेर निघे पर्यंतचा प्रवास जाणून घेण्यासाठी व सध्या एआयडी निर्बंध मध्ये असलेल्या बँकांना अनुकरण करण्यासाठी खूप मदत करेल याकरिता डॉ. आशिष शहा, प्रोफेसर येमेरीटस, रामचरण स्कूल ऑफ लीडरशिप यांच्या नेतृत्वाखाली टीम बँकेस भेट देऊन इच्छित असून आपल्या सोयीस्कर तारखेस आम्ही चर्चा करण्यासाठी येत असल्याबाबत त्यांनी कळविले असल्याची माहिती बँकेचे अध्यक्ष डॉक्टर आदित्य सारडा यांनी दिली.

**मंत्री बँकेचा आदर्श देशातील बँका घेणार हा गौरव मोठा आहे**

काही कारणास्तव मंत्री बँकेवर रिझर्व बँकेने लादलेले निर्बंध एक वर्ष बँकेवर संचालक मंडळ होते. त्यानंतर अवघ्या एका वर्षात केलेल्या अथक प्रयत्नामुळे व्दारकादास मंत्री बँक रिझर्व बँकेच्या निर्बंधातून बाहेर पडली अन्? बँक पूर्वपदावर आली. दोन वर्षात रिझर्व बँकेचे निर्बंध हटऊन पूर्व पदावर येणारी देशातील मंत्री बँक पहिलीच बँक असावी. त्यामुळे केंद्राच्या टाक्स फोर्सने बँकेच्या कार्यपद्धतीची प्रशंसा करत रिझर्व बँकेने लावलेल्या इतर बँकांनीही मंत्री बँकेप्रमाणे कार्यपद्धती अवलंबून निर्बंधातून बाहेर पडावे यासाठी मंत्री बँक त्यांना आदर्श ठरणार आहे. हा आमच्यासाठी मोठा गौरव आहे.

डॉ. आदित्य सारडा, अध्यक्ष मंत्री बँक

**काय आहे टाक्स फोर्स**

केंद्र शासनाच्या सहकार मंत्रालयाकडून सहकारी बँकांची समस्या जाणून घेण्यासाठी, शासनास सल्ला देण्यासाठी आणि सहकारी बँकिंग क्षेत्राच्या परिवर्तनासाठी नियुक्त केलेल्या पथकाला टास्क फोर्स म्हटले जाते. त्यांनी दिलेल्या अहवालानुसार केंद्र सरकार आणि सहकार मंत्रालय काम करते.

## पान ६ वरून...

पान ६ वरून...

### आषाढी कार्तिक विसरू

उद्धार, ईश्वर प्राप्ती आणि समतेचा संदेश देणारी वारी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून रामकृष्ण हरीचा जयघोष करत पंढरीच्या दिशेने धावणाऱ्या वारकऱ्यांसाठी आषाढी वारी म्हणजे पांडुरंगानेच वारकऱ्यांना घातलेली साद होय. कोणतेही निमंत्रन नसताना लाखोच्या संखेने विठ्ठल भक्त एकत्र येऊन, हरिनामाच्या गजरात गुण्या गोविंदाने पायी वाटचाल करत असतात. आपसातील आपपर भाव विसरून सकल जन समुदायाच्या कल्याणासाठी पांडुरंगाला प्रार्थना करणारा हा सात्विक सोहळा सर्व सामान्य ईश्वर भक्तांना प्रेरणा आणि बळ देणारा आहे. अध्यात्म, संस्कार आणि भक्तीचा संदेश देण्याचे अखंड काम श्री क्षेत्र नारयणगड येथे अविरतपणे चालू आहे. महाराष्ट्राची धाकटी पंढरी म्हणून श्री क्षेत्र नारायणगडाचा मला अभिमान आहे. असे भाव उद्गार राजेंद्र मस्के यांनी पंढरपूर वारीसाठी जाणाऱ्या भाविक भक्तासमोर व्यक्त केले.

### शिंपोरा ते खुंटेफळ

शेतकरी बांधवांच्या वतीने त्यांचे जाहीर आभार मानण्यात येते आहेत यापुढेही लवकरात लवकर काम व्हावे यासाठी लवकरच भरघोस निधीची तरतूद केली जाईल असे अजितदादा पवार यांनी यावेळी बोलताना सांगितले.या योजनेला निधी उपलब्ध करून दिल्याबद्दल आ. बाळासाहेब आजबे यांनी राज्याचे मुख्यमंत्री ना. एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री ना. अजित पवार, उपमुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस, बीडचे पालकमंत्री ना. धनंजय मुंडे यांचे आभार मानले आहेत.

### राष्ट्रीय महामार्गाचे कर्तव्यशुन्य

पुल तयार केला होता. परंतु काल अचानक आलेल्या पावसामुळे तो पुल वाहुन गेला असुन वाहतुक ठप्प झाली आहे,त्यामुळे तब्बल २५ गावाचा संपर्क तुटला असून वाहतूक व्यवस्था सुद्धा कोलमडून गेल्याने प्रवाशांसह नागरिकांचे मोठे हाल होतांना दिसत आहे

या विषयी सविस्तर माहिती अशी की,साबलखेड ते आष्टी असा १७ किलोमीटर राष्टीय महामार्गाचे गेल्या दीड वर्षांपासून काँक्रीटीकरणाचे काम अतिशय कासवगतीने चालू असून ठिकाणी ठिकाणी लहान मोठे नाल्यावरील नदीवरील पुलाचे सुध्दा नव्याने काम सुरू आहे कडा,शेरी बु ,खाकळवडी,जळगाव,कासारी येथे मोठमोठ्या नदीवरील पुलाचे काम नव्याने करण्यात येत आहे तसेच कडा येथे अमोलक जैन विद्यालय, पेट्रोलपंप,शेरी बु-२,वटनवाडी-३, कासारी येथे असे लहान लहान ओढ्यावर पुलाचे काम चालू असून पावसाळ्यापूर्वी पूर्ण न झाल्याने सध्या मृत्यूचे सापळे बनले आहे. रात्री अचानक आलेल्या पावसाच्या पाण्यामुळे खड्ड्याचा अंदाज न आल्याने एक वाहन थोडक्यात बचावले,दुर्दैवाने खड्ड्यात एखादा मोठा अपघात झाला तर याला जबाबदार कोण?असा प्रश्न शिवसंग्रामचे तालुका अध्यक्ष ज्ञानेश्वर चौधरी यांनी उपस्थित केला आहे यापूर्वी विविध प्रसार माध्यमातून वेळोवेळी होणाऱ्या धोक्याची जाणीव करून देऊन सुद्धा राष्ट्रीय महामार्गाचे कर्तव्यशुन्य प्रशासकीय अधिकारी व ठेकेदार मात्र याकडे सोयीस्कर पणे डोळेझाक करत असून या अधिकाऱ्यांना सेवेतून बडतर्फ करून त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी ज्ञानेश्वर चौधरी यांनी प्रसिद्ध पत्रकाद्वारे केली आहे.

### घागरवाड्यात सर्वज्ञ करिअर

२२५००० रोपे लावून पर्यावरण संवर्धन व वनीकरण करणार आहे.ह्या प्रसंगी सर्वज्ञ करिअर अकॅडमी चे संचालक बांगर विद्यार्थी, घागरवाडा चे ग्रामस्थ, वन विभागाचे प्रादेशिक वन अधिकारी शयु एच चिकटे,वन विभागाचे कर्मचारी,इको बटालियन चे कंपनी कमांडर ले कर्नल अमित प्रभू, सुभेदार मोरे, सुभेदार दिवेकर, हवालदार सोमवसे, नायक शेख व इतर सैनिक उपस्थित होते.

### नगरसेवक रंजीत बनसोडे

वनवास संपेल कधी याची खंत वाटत असून मावेजा प्रश्न सोड़वा भूसपादनाचे पत्र दया आणि रस्ता काम सुरु करा अशी मागणी करुण माजी जिल्हाधिकारी यांचा सत्कार करुन त्यांना पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.यावेळी शितल जाधव, शैला वारे,जयश्री रनसींग,रेहाना पठान, खुर्शीद आलम,नगरसेवक रंजीत बनसोडे आदी उपस्थित होते.

### ढगाळ वातावरणामुळे

आल्यामुळे तसेच हलक्या जमिनीवर आणि चुनखडी युक्त पांढ्या जमिनीवर सूक्ष्म अन्नद्रव्य कमतरतेमुळे सोयाबीनची पाने पिवळी पडत असल्याचे निदर्शनास येत आहे ही सूक्ष्म अन्नद्रव्याची कमतरता म्हणजेच क्लोरोसिस (हरितरोग) ही विकृती असून याच्या व्यवस्थापनासाठी १९:१९:१९ हे फॉलियर ग्रेड विद्राव्य खत ५ ग्रॅम अधिक महाराष्ट्र ग्रेड दोन द्रवरूप सूक्ष्म अन्नद्रव्याची २ मिली प्रति १ लिटर पाणी किंवा पावडर स्वरूपातील महाराष्ट्र ग्रेड दोन सूक्ष्म अन्नद्रव्याची २ ग्रॅम याप्रमाणे फवारणी करावी. वेगवेगळ्या कीडनाशकांची मिश्रणे करू नये, कीटकनाशकासोबत विद्रव्य खते, संप्रेरके इत्यादी मिसळू नये. फवारणीसाठी वापरण्यात येणाऱ्या पाण्याचा सामू ५-७ असावा. कीटकनाशकाच्या डब्यावरील सूचना वाचून त्याचे पालन करावे व फवारणी करताना सुरक्षा साधनांचा वापर करावा असा सल्ला ऊस विकास अधिकारी शिवप्रसाद येळकर यांनी दिला आहे.

### जिल्ह्यात खतांची कृत्रिम

आल्याने शेतकरी खतांच्या खरेदीसाठी बाजारात गर्दी करत आहेत. नेमक्या याच संधीचा फायदा घेत कृषी दुकानदारांकडून जास्त मागणी असलेल्या खतांची कृत्रिम टंचाई निर्माण करण्याचे प्रकार वाढतात. खतांची कृत्रिम टंचाई निर्माण करुन शेतकऱ्यांची अव्वाच्या सव्वा लूट करण्यात येते. यामुळे कृषी विभागाने वेळीच दक्ष राहून बाजारात खतांची कृत्रिम टंचाई निर्माण होणार नाही याची काळजी घ्यावी व खतांची कृत्रिम टंचाई निर्माण करणाऱ्या दुकानदारांवर तात्काळ कारवाई करुन त्यांचा परवाना रद्द करावा अशी मागणी शिवसेनेचे जिल्हाप्रमुख अनिल जगताप, सचिन मुळूक यांनी केली आहे.

# टोमॅटोचे शतक: मुंबईच्या बाजारात टोमॅटो १०० ते १२० रुपये किलो

## दर वाढण्याचं कारण काय? ; सध्या टोमॅटो उत्पादक शेतकऱ्यांना

चांगले दिवस आले आहेत. कारण दिवसेंदिवस टोमॅटोची लाली वाढत असल्याचं पाहायला मिळत आहे. दरात मोठी वाढ झाली आहे. मुंबईत टोमॅटोचे दर १०० ते १२० रुपये प्रतिकिलोवर पोहोचले आहेत. तर दिल्ली-एनसीआर भागात टोमॅटोचे किरकोळ दर हे ९० रुपये किलोवर पोहोचले आहेत. जाणून घेऊयात कोणत्या बाजारात टोमॅटोला किती दर मिळत आहे.

टोमॅटोच्या वाढत्या दराचा फायदा शेतकऱ्यांना

टोमॅटोच्या वाढत्या दराचा फायदा शेतकऱ्यांना होत आहे. तर सर्वसामान्यांच्या खिशाला वाढत्या दरामुळं झळ लागच आहे. मान्सूनच्या पावसामुळे दिल्लीसह अनेक राज्यांतील टोमॅटोच्या पुरवठ्यावर विपरीत परिणाम झाला आहे. टोमॅटोचे भाव गगनाला भिडू लागले आहेत. आझादपूर मंडी, गाझीपूर मंडी आणि ओखला भाजी मार्केट यांसारख्या दिल्लीतील अनेक मोठ्या घाऊक भाजी मार्केटमध्ये टोमॅटोच्या किमतीत मोठी वाढ झाली आहे. जिथे काही दिवसांपूर्वी किरकोळ बाजारात टोमॅटो २८ रुपये किलोने विकला जात होता, तिथे आता टोमॅटो ९० रुपये किलो झाला आहे.

पावसामुळे टोमॅटोच्या पुरवठा साखळीवर परिणाम : गेल्या आठवडाभरापासून सुरू असलेल्या पावसामुळे टोमॅटोच्या पुरवठा साखळीवर परिणाम




झाला आहे. मुसळधार पावसाचा कर्नाटक, हिमाचल आणि महाराष्ट्र यांसारख्या टोमॅटो उत्पादक राज्यांमधून जाणाऱ्या ट्रकवर विपरीत परिणाम झाला आहे. त्याचा परिणाम टोमॅटोच्या दरावर दिसून येत आहे. आठवडाभरात टोमॅटोचे दर ६० ते ७० रुपयांवर पोहोचले आहेत. गेल्या आठवडाभरापासून सुरू असलेल्या पावसामुळे टोमॅटो पिकांवरही विपरीत परिणाम झाला आहे. पावसाळ्यामुळे टोमॅटो सडत असल्याने पुरवठा साखळीवरही परिणाम होत आहे. अशा स्थितीत कमी पुरवठ्यामुळे दरात वाढ होत असल्याचं चित्र पाहायला मिळत आहे.

कोणत्या बाजारात टोमॅटोला किती दर?

मुंबई - १०० ते १२० रुपये प्रति किलो
दिल्ली - ९० रुपये प्रति किलो
मुरादाबाद - ७० ते ८० रुपये किलो
मेरठमध्ये - ८० रुपये किलो
गाझीपूर - ८० रुपये किलो

चंदीगड ५० रुपये किलो मिळालेल्या माहितीनुसार, अन्नधान्याच्या महागाईत कोणतीही घट झालेली नाही. गेल्या वर्षभरात बटाटे, कांदे आणि टोमॅटोच्या दरात ८१ टक्क्यांची वाढ झालीय. यामुळे व्हेज थाळीच्या किंमतीत देखील वाढ झाल्याचं पाहायला मिळत आहे. बदलत्या हवामानाचा देखील शेती पिकांवर मोठा परिणाम होत असल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. त्यामुळं शेती पिकांच्या दरात वाढ होत असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.

## जाणून घ्या हायड्रोपोनिक चारा आणि त्याचे फायदे



शेतकरी दूध विक्रीतून मिळणाऱ्या पैशातून कुटुंबाची आर्थिक गरज भागवतात.

मात्र, गेल्या काही दिवसांपासून शेतीचं क्षेत्र कमी होत असल्याचे समोर आले आहे. शेतकऱ्यांसमोर चाऱ्याची समस्या मोठ्या प्रमाणावर निर्माण होत आहे. चाऱ्याच्या समस्येवर मार्ग काढण्यासाठी शेतकऱ्यासमोर हायड्रोपोनिक्स तंत्रज्ञानाचा वापर करुन चारा उपलब्ध करण्याचा मार्ग उपलब्ध झाला आहे. शेतकरी हायड्रोपोनिक्स तंत्रज्ञानाद्वारे १० दिवसांमध्ये चारा तयार करु शकतात. मक्याच्या बियांपासून फक्त हायड्रोपोनिक चारा ट्रे मध्ये पाणी शिंपडून चारा पिकवता येतो. या तंत्राचा वापर करून चारा तयार करण्यासाठी खूप कमी वेळ लागतो. हायड्रोपोनिक्स तंत्राद्वारे शेतकरी बांधवांना फक्त १० दिवसात चारा मिळू शकतो. हायड्रोपोनिक तंत्रज्ञानाचा वापर करून शेती करणे खूप महाग आहे, कारण त्यात खूप खर्च होतो.

१०. मात्र, स्थानिक बाजारपेठेत किंवा घरी उपलब्ध होणाऱ्या वस्तू आणि साधनं वापरून कमी खर्चात चारा पिकवता येऊ शकतो.

हायड्रोपोनिक चाऱ्याचे फायदे : हायड्रोपोनिक्स चाऱ्यामध्ये पारंपारिक चारा कोरडे अन्न किंवा धान्यापेक्षा जास्त पोषक असतो. त्यात उच्च कार्बोहायड्रेट, खनिजे आणि जीवनसत्त्वे असतात. पारंपारिक चाऱ्याच्या वाढवण्यासाठी अनेकदा दोन महिने लागतात, पण तुम्ही फक्त एका आठवड्यात हायड्रोपोनिक चारा वाढवू शकता. पारंपरिक चारा उत्पादनाच्या तुलनेत हायड्रोपोनिक चारा उत्पादनासाठी कमी पाणी लागते. एक किलो हायड्रोपोनिक चारा पिकवण्यासाठी फक्त ३ ते ४ लिटर पाणी आवश्यक आहे; दुसरीकडे, पारंपारिक चाऱ्यासाठी अंदाजे ७०-१०० लिटर पाणी लागते. कमी पाण्याची समस्या असतानाही हायड्रोपोनिक चारा वर्षभर नियमितपणे तयार करता येतो. हायड्रोपोनिक चारा पिकवण्यासाठी कोणत्याही रसायनांची किंवा कीटकनाशकांची गरज नसते. जनावरांच्या शरीरात प्रथिने, खनिजे, जीवनसत्त्वाच्या उपलब्धतेत वाढ होते. प्रथिने, जीवनसत्त्वे, फॉलिक ॲसिड, ओमेगा-३, स्निग्ध पदार्थ हरितद्रव्य मोठ्या प्रमाणात असतात. पशुखाद्याचा खर्च ४० टक्के कमी होतो. जनावरांच्या रोगप्रतिकारक शक्तीत वाढ होते. दुधाच्या फॅट मध्ये वाढ होते. किमान अर्धा लिटर दुधात वाढ होते. जनावरांची प्रजनन क्षमता सक्षम होते.

प्रति किलो हायड्रोपोनिक्स चार्यामधील घटक : १. कॅल्शियम- ०.११ %, २. विटामीन - २५.०१ %, ३. विटामीन - ४५.०१ %, ४. विटामीन - २६.०३%, ५. प्रथिने- १३ ते २० % ६. रायझेस्टिक फायबर- ८०.९२

## छत्रपती संभाजीनगरात ९० टक्के खरीप पेरण्या पूर्ण

संभाजीनगर : राज्यभरात पावसाने सध्या दाणादाण उडली असून जनजीवन विस्कळीत झाले आहे. दरम्यान, मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात पुढील ५ दिवस हवामान ढगाळ राहणार असून हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता प्रादेशिक हवामान केंद्र व जिल्हा कृषी हवामान केंद्राने वर्तवली आहे.

कृषी विभागाने मंगळवारी जाहीर केलेल्या पेरणी अहवालानुसार, छत्रपती संभाजीनगर विभागात एकूण ९०% क्षेत्रावर खरीप पेरणी झाली आहे. तुरळक ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची नोंद झाली असून पेरणी झालेली पिके उगवण ते वाढीच्या अवस्थेत असल्याचे सांगण्यात आले.


छत्रपती संभाजीनगर विभागात खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र २०.९० लाख हेक्टर असून ८ जुलै २०२४ पर्यंत जिल्ह्यात १८.९१ लाख हेक्टर क्षेत्रावर शेतकऱ्यांनी पेरण्या केल्या आहेत. खरीप हंगामातील बाजरी मका सोयाबीन तूर उडीद मूग कापूस भुईमूग या पिकांच्या पेरण्या प्रगतीपथावर असल्याचेही सांगण्यात आले. राज्यातील पीक पेरणी अहवालानुसार बहुतांश राज्यात आकाश ढगाळ असून छत्रपती संभाजीनगरसह, लातूर विभागात या आठवड्यात हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची नोंद झाली. एक जून ते आठ जुलै या कालावधीत राज्यातील सरासरी पाऊस हा २९३ मिमी असून मागील वर्षीच्या सरासरीच्या तुलनेत ७१.७% पाऊस झाला. अहवालानुसार जून २०२४ मध्ये पावसामुळे शेती व फळ पिकांचे नुकसान झाले असून राज्यात २५९२ हेक्टर क्षेत्र बाधित झाले आहे. तसेच १६० हेक्टर जमीन खरडून गेल्याचे नोंदवण्यात आले.

पाच दिवस हवामान कसे राहणार?

मराठवाड्यात पुढील पाच दिवस हलक्या ते मध्यम सरींचा पाऊस पडणार असून आकाश ढगाळ राहण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. बुधवारी तुरळक ठिकाणी वादळी वाऱ्यासह जोरदार पावसाची शक्यता असून वाऱ्याचा वेग ३० ते ४० किलोमीटर प्रतितास राहण्याचा अंदाज आहे.

शेतकऱ्यांनी ही कामे करावीत

सोयाबीन, बाजरी, भुईमूग, ज्वारी या पिकामध्ये कोळपणी व खुरपणीची कामे करून घ्यावी. खरीप ज्वारीची पेरणी होऊन ३० दिवस झाले असल्यास नत्राचा दुसरा हप्ता ४० किलो प्रती हेक्टरी युरियाद्वारे द्यावा. अद्रक पिकात तनव्यवस्थापन करून बुरशीजन्य रोगांचा प्रादुर्भाव थांबवण्यासाठी कृषी विद्यापीठाने विकसित केलेले बुरशीनाशक द्यावे.



## आता एकाच वेळी लावा चार ओळीत कांदा

भारतीय कृषी संशोधन संस्थेने ट्रॅक्टरवर चालणारे अर्का राइज्ड बेड ओनियन बल्बलेट प्लांटर विकसित केले आहे. त्यामुळे कांदा लागवडीचे काम अगदी सोपे होते. या मशीनला एक साखळी जोडलेली आहे, जी एकाच वेळी ४ ओळींमध्ये कांदा लावते. कांदा हे भारतातील महत्त्वाचे व्यावसायिक भाजीपाला पीक आहे, जे तीन प्रकारांमध्ये विभागले गेले आहे. सामान्य कांद्याप्रमाणे, लहान सामान्य कांदा आणि गुणक किंवा शॉलॉट्स ज्याला मद्रास कांदा म्हणतात. गुणक कांदे ५-६ बल्बच्या क्लस्टरमध्ये वाढतात. तामिळनाडू, आंध्र प्रदेश, दक्षिण कर्नाटक, ओडिशा आणि केरळच्या काही भागात याची लागवड केली जाते.

देशातील बहुगुणित कांद्यापैकी जवळपास ९० टक्के कांदा तामिळनाडूमधून येतो. या संदर्भात, ने कमी खर्चात अधिक कांदा पिकवण्यासाठी ट्रॅक्टरवर चालणारे एक अप्रतिम मशीन तयार केले आहे. त्याच्या मदतीने शेतकरी कमी वेळेत एकाच वेळी ४ ओळीत कांदा पेरणी करू शकतात. याच्या लागवडीसाठी, ६ महिने साठवलेल्या कांद्याचे बियाणे वापरले जाते. प्रत्यारोपणाच्या वेळी, प्रत्येक



बियामध्ये सुमारे १५-२० सेमी अंतर ठेवावे लागते. अशा स्थितीत लागवड करण्यासाठी बराच वेळ जातो. त्यामुळे लागवडीसाठी अधिक मजुरांची गरज आणि जास्त मजुरी यामुळे खर्चात ११.९ टक्के वाढ होते.

अर्का राइज्ड बेड म्हणजे काय : भारतीय कृषी संशोधन संस्था म्हणजेच आयसीएआरने ट्रॅक्टर-चालित अर्का राइज्ड बेड ओनियन बल्बलेट प्लांटर विकसित केले आहे. त्यामुळे कांदा लागवडीचे काम अगदी सोपे होते. या मशीनला एक साखळी जोडलेली आहे, जी एकाच वेळी ४ ओळींमध्ये कांद्याचे बल्ब लावते.

मशीन अशा प्रकारे काम करते : हॉपरमध्ये कांद्याचे बल्ब भरले जातात आणि ट्रॅक्टर ताशी १.५ किलोमीटर वेगाने पुढे नेले जाते. समोरचा उभा असलेला भाग ८५०-९०० मिमी रुंदीचा आणि २०० मिमी उंचीचा बेड बनवतो. हे कांद्याचे बल्ब लावण्यासाठी ५० मिमी रुंदीचे आणि ५० मिमी खोलीचे खोबरे बनवतात. बियाणे मोजण्याची यंत्रणा बियाण्यांच्या साठवणुकीतून कांद्याचे बल्ब मोजते आणि ते बियाणे नळीपर्यंत पोहोचवते. यानंतर, कांद्याचे बल्ब खोबणीत ठेवतात आणि मातीने भरतात. या मशीनची कार्य क्षमता ०.१२ हेक्टर/तास आहे. या मशीनच्या मदतीने ३५ टक्के श्रम, खर्च आणि वेळ वाचतो.

कसे वापरायचे : एकाच वेळी दोन उद्देशांसाठी वापरले जाऊ शकते. (उभारलेले बेड तयार करणे आणि बल्ब लावणे). तीन फरोसह दोन उंच बेड तयार करण्याची आणि एकाच वेळी आठ ओळी (प्रत्येक बेडमध्ये चार ओळी) लावण्याची क्षमता आहे. ०.३० हेक्टर/तास क्षेत्र क्षमता ७१ टक्क्यांपर्यंत खर्चात बचत करते.




### महत्वाच्या घटना

१६५९ : अफझलखानाशी मुकाबला करण्यासाठी शिवाजी राजे राजगडवरुन निघून प्रतापगड येथे पोचले.
१८०१ : फ्रेन्च खगोलविद जॉन लुई पॉन याने 'पॉन' धूमकेतूचा शोध लावला.
१८९३ : कोकिची मिकीमोटो यांनी पहिला 'कल्चर्ड' मोती मिळवला.
१९०८ : लोकमान्य टिळकांना मंडालेची ६ वर्षाची शिक्षा झाली.
१९१९ : नेदरलँड देशामध्ये आठ तासांचा दिवस आणि रविवार सुट्टी असा कामगारांसाठी कायदा लागू झाला.
१९२१ : मंगोलियन पीपल्स रिपब्लिक स्थापना.
१९३० : ऑस्ट्रेलियाचे सर डोनाल्ड ब्रॅडमन यांनी इंग्लंडविरुद्धच्या कसोटी सामन्यात एकाच दिवसात विक्रमी नाबाद ३०९ धावा केल्या.
१९५० : पाकिस्तान आंतरराष्ट्रीय नाणेनिधिचा सदस्य बनला.
१९५५ : अमेरिकेने आपल्या चलनावर 'देवावर आमचा विश्वास आहे' असे छापण्याचे ठरवले.
१९६२ : पहिले ट्रान्सअटलांटिक उपग्रह दूरदर्शन प्रसारण झाले.
१९६२ : प्रोजेक्ट अपोलो नासाने चंद्रावर अंतराळवीरांना उतरवण्याचे आणि त्यांना पृथ्वीवर परत आणण्याची घोषणा केली.
१९७१ : चिलितील तांब्याच्या खाणींचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले.
१९७७ : मार्टिन ल्यूथर किंग ज्युनियर यांना प्रेसिडेंशियल मेडल ऑफ फ्रीडमने सन्मानित करण्यात आले.
१९७९ : अमेरिकेची 'स्कायलॅब' ही अंतराळातील प्रयोगशाळा रात्री दहाच्या सुमारास हिंदी महासागरात कोसळली.
१९८९ : जागतिक लोकसंख्या दिन सुरुवात.
१९९४ : दिल्लीच्या पोलिस महानिरीक्षक (तुरुंग) किरण बेदी यांना 'रॅमन मॅगसेसे पुरस्कार' जाहीर
२००१ : आगरताळा ते ढाका या शहरांदरम्यान बससेवा सुरू झाली.
२००६ : मुंबईत उपनगरी गाड्यांमध्ये झालेल्या स्फोटांत २०९ लोक ठार तर ७१४ लोक जखमी झाले.
२०१० : साली स्पेन देशाने नेदरलँड्स फुटबॉल संघाचा पराभव करून फुटबॉल विश्वचषक जिंकला.
२०२१ : रिचर्ड ब्रॅन्सन हे त्याच्या व्हर्जिन गॅलेक्टिक अंतराळयानाद्वारे अंतराळात जाणारे पहिले सामान्य नागरिक बनले.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८५७ : भारतीय राजकारणी व भारतीय राष्ट्रीय काँग्रेस चे अमरावती येथील अध्यक्ष सी. शंकरन नायर यांचा जन्मदिन.
१८८९ : नारायण हरी आपटे कादंबरीकार, चित्रपट कथालेखक. 'सुखाचा मूलमंत्र', 'पहाटेपुर्वीचा काळोख', 'उमज पडेल तर', 'एकटी' या त्यांच्या काही प्रसिद्ध सामाजिक कादंबर्या होत. 'कुंकू' हा गाजलेला चित्रपट त्यांच्या 'न पटणारी गोष्ट' या कादंबरीवर आधारलेला होता. (मृत्यू: १४ नोव्हेंबर १९७१ कोरेगाव, जिल्हा सातारा)
१८९१ : परशुराम कृष्णा गोडे प्राच्यविद्या संशोधक. त्यांनी ४०० विषयांवर संशोधन करुन लिहीलेले निबंध ८ खंडात प्रसिद्ध झाले आहेत. (मृत्यू: २८ मे १९६१)
१९०२ : भारतीय शीख राजकीय नेता व भारतीय स्वातंत्र्य चळवळीचे नेता आणि भारताचे पहिले संरक्षण मंत्री सरदार बलदेव सिंह यांचा जन्मदिन.
१९२१ : शंकरराव खरात दलित साहित्यिक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू (मृत्यू: ९ एप्रिल २००१)
१९२३ : टुण टुण भारतीय अभिनेत्री आणि कॉमेडियन (निधन: २४ नोव्हेंबर २००३)
१९२७ : थिओडोर हेरॉल्ड मॅमन लेसरचे निर्माते (निधन: ५ मे २००७)
१९३४ : जियोर्जियो अरमानी कंपनीचे स्थापक जियोर्जियो अरमानी यांचा जन्म.
१९५३ : सुरेश प्रभू केंद्रीय पर्यावरण आणि वन मंत्री, उद्योगमंत्री, ऊर्जामंत्री आणि अवजड उद्योग मंत्री
१९५६ : भारतीय-अमेरिकन लेखक आणि शैक्षणिक अमिताव घोष यांचा जन्म.
१९६० : भारतीय हिंदी चित्रपट अभिनेता कुमार गौरव यांचा जन्मदिन.
१९६७ : भारतीय-अमेरिकन कादंबरीकार आणि लघु कथालेखक झुम्पा लाहिरी यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१६३० : कलकत्ता शहरात आलेली पहिली विदेशी महिला बेगम रेजाबिबेह सुकिएस यांचे निधन.
१९१२ : फ्रेंच नेत्र रोग विशेषज्ञ फर्डिनेंड मोनॉयर यांचे निधन.
१९८९ : सर लॉरेन्स ऑलिव्हिये ब्रिटिश अभिनेता, दिग्दर्शक व निर्माता (जन्म: २२ मे १९०७)
१९९४ : रणांगणावरील असामान्य कामगिरीबद्दलचा 'परमवीर चक्र' हा सर्वोच्च सन्मान मिळवणारे मेजर (निवृत्त) रामराव राघोबा राणे यांचे निधन. हा सन्मान मिळवणारे 'बॉम्बे सॅपर्स'चे आणि महाराष्ट्रातील एकमेव अधिकारी होते. (जन्म:)
२००३ : सुहास शिरवळकर कादंबरीकार आणि रहस्यकथालेखक (जन्म: १५ नोव्हेंबर १९४८)
२००३ : पद्मभूषण, साहित्य अकादमी पुरस्कार व संगीत नाटक अकादमी पुरस्कार सन्मानित प्रसिद्ध भारतीय हिंदी लेखक, नाटककार आणि अभिनेते भीष्म साहनी यांचे निधन.
२००९ : शांताराम नांदगावकर गीतकार (जन्म: १९ आक्टोबर १९३६)

# बायपासच्या सर्व्हिस रोड, फ्लाय ओव्हरचा मुद्दा अधिवेशनात

## आ.संदीप क्षीरसागरांनी केली तात्काळ कार्यवाहीची मागणी




बीड । प्रतिनिधी

शहरालगत असलेल्या धुळे-सोलापुर राष्ट्रीय महामार्गावर आवश्यक ठिकाणी स्लीप सर्व्हिस रोड आणि शहराचे प्रवेशद्वार असलेल्या दोन्ही ठिकाणी फ्लायओव्हर (उड्डाणपूल) होण्यासाठी आ.संदीप क्षीरसागरांनी वारंवार पाठपुरावा केला आहे. आ.क्षीरसागर यांनी विधीमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात सदरील मुद्दा मांडून यावर तात्काळ कार्यवाही करण्याची मागणी सभागृहाकडे केली आहे.

धुळे-सोलापूर राष्ट्रीय महामार्गाचा बीड शहराच्या लगत बाजूने १२ किलोमीटरचा बायपास आहे. याठिकाणी आयआरसी (इंडियन रोड काँग्रेस) च्या गाईडलाईन्स नुसार बायपास रोडला जोडणार्या परळी रोड, नाथापूर रोड व इमामपूर रोड या ठिकाणी स्लीप सर्व्हिस रोड आवश्यक आहे. यांपैकी परळी रोड आणि नाथापूर रोड राज्यमार्ग याठिकाणी २०१८ मध्येच सर्विस रोड मंजूर असून अद्यापपर्यंत त्याचे काम सुरू नाही. तसेच इमामपूर रोड प्रमुख जिल्हा मार्ग याठिकाणी सर्विस रोड मंजूर नाही. याबाबत पाठपुरावा करूनही कार्यवाही होत नसल्याने आ.संदीप क्षीरसागर यांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. त्यावर न्यायालयाने राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडून येणार्या अर्थिक वर्षात काम पूर्ण करण्याचे शपथपत्र घेतले आहे. दरम्यान बायपासवरील महालक्ष्मी चौक, जिरेवाडी व छत्रपती संभाजी महाराज चौक, समनापूर याठिकाणी उड्डाणपूल नसल्याने मोठ्या प्रमाणावर अपघात होऊन जीवीतहानी होत आहे. तसेच तीन वाहतुकीच्या रस्त्यांसाठी स्लीप सर्व्हिस रोड नसल्याने १२ किलोमीटर बायपासला वळसा घालुन जावे लागत असल्यामुळे नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. सोबतच या बायपासच्या लगत दोन्ही बाजूंनी शेतकर्यांच्या जमीनी आहेत. या शेतकऱ्यांना शेतात जाण्या-येण्यासाठी कसलीही सोय नाही.यावर आ.संदीप क्षीरसागर यांनी हा महत्त्वाचा प्रश्न लवकरात लवकर मार्गी लागावा यासाठी बुधवार (दि.१०) रोजी विधीमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात हा मुद्दा मांडला आणि तात्काळ या विषयावर कार्यवाही करण्याची मागणी सभागृहाकडे केली.

### मांजरसुंबा घाटातील सुरक्षेचा मुद्दाही केला उपस्थित

दरम्यान, मांजरसुंबा येथील घाटात पावसाळ्यात दरड कोसळण्याच्या घटना मोठ्या प्रमाणात घडतात. येथील सुरक्षेच्या बाबतीतही हलगर्जीपणा होत असून, प्लॅन ऑफ इस्टीमेटनुसार कामाचा दर्जा नसल्याचे दिसत आहे. हा महत्त्वाचा मुद्दा उपस्थित करत याबाबत तातडीने कार्यवाही करण्याची मागणी आ.संदीप क्षीरसागर यांनी अधिवेशनात केली.

# ईश्वरबाबा भारती पायी दिंडीचे पंढरपूरकडे प्रस्थान

## लिंबागणेश येथे जल्लोषात स्वागत



लिंबागणेश । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील मौजे बेलगाव येथील श्रीक्षेत्र बेलेश्वर संस्थान मठाधिपती प.पु.महंत महादेव भारती व ह.भ.प.शांतीब्रम्ह तुकाराम महाराज भारती यांच्या मार्गदर्शनात बेलगाव येथील ''श्रीगुरू ईश्वरबाबा भारती पायी दिंडी सोहळा ''श्रीक्षेत्र पंढरपूर कडे वारक-यांनी टाळ मृदंगाच्या गजरात तल्लीन होत ''ग्यानबा, तुकाराम'' गजर करत डोक्यावर तुळशीवृंदावन,हाती दिंड्या पताका घेतलेले वारकरी अशा भक्तिमय वातावरणात आषाढी वारीसाठी दिंडी रवाना झाली. बालाघाटावरील बेलेश्वर संस्थान प्रसिद्ध असुन पायी दिंडी सोहळ्याचे हे दुसरे वर्ष असुन त्याला प्रतिसाद देत मोठ्या प्रमाणावर भाविक दिंडीत सहभागी झाले होते.दिंडीमध्ये जवळपास ७०० महिला पुरुष सहभागी झाले होते.आज दि.१० बुधवार रोजी सकाळीच १० वाजता बेलेवर संस्थान येथे दिंडी प्रस्थानावेळी पंचक्रोशीतील भाविक वारकरी जमा झाले होते.

आषाढी एकादशीला विठ्ठलाच्या दर्शनासाठी पंढरपुरला जाणा-या वारक-यांसाठी लिंबागणेश ग्रामस्थांच्या वतीने गेल्यावर्षी प्रमाणेच ईश्वरभारती मंदिरात महाप्रसादाची सोय करण्यात आली होती.तत्पुर्वी गावच्या वेशीवर महंतांचे पुष्पहार घालून स्वागत रांगोळी,पायघड्या व सुवासीनींनी औक्षण करुन मंदिरापर्यंत सवाद्य मिरवणूक काढत त्यांचे स्वागत करण्यात आले. यावेळी सरपंच बालासाहेब जाधव,उपसरपंच बाळकृष्ण थोरात, कल्याण वाणी , दामु थोरात,विक्रांत वाणी, विनायक मोरे, पांडुरंग वाणी,अनंत मुळे, बाजीराव दशमे,चोपदार धर्मा थोरात,अजिनाथ वाणी, बाबुराव वाणी, शिवहारी कोटुळे, हरिओम क्षीरसागर, अभिजित गायकवाड, संतोष भोसले,डॉ.गणेश ढवळे आदि उपस्थित होते.

# शंभर टक्के नुकसान भरपाई आणि आदामा कंपनीचा औषधनिर्माण परवाना रद्द करा

## काँग्रेसचे दत्ता कांबळे यांनी कृषी कार्यालय धरले धारेवर :अन्यथा आंदोलन



माजलागाव । प्रतिनिधी

पुरुषोत्तमपुरी येथील नुकसानग्रस्त शेतकरी बाळासाहेब शेंडगे यांनी दोन एक्कर शेतात सोयाबीनवर आदामा कंपनीचे तननाशक फवारणी केली होती. आदामा कंपनीच्या तननाशक फवारणी केल्यानी बाळासाहेब शेंडगे यांचे दिड एक्कर वरील सोयाबीन जळूण खाक झाल्याने सदरील शेतकऱ्याचे अतोनात नुकसान झाले होते.

सदरील नुकसानग्रस्त शेतकऱ्याला न्याय मिळून देण्याच्या अनुषंगाने भारतीय काँग्रेस पक्षाच्या अनु जाती विभागाचे जिल्हाध्यक्ष दत्ता कांबळे यांच्या नेतृत्वात दि १० जुलै बुधवार रोजी उपविभागीय कृषी अधिकारी कार्यालय यांना नुकसानग्रस्त शेतकऱ्यास शंभर टक्के नुकसान भरपाई व अदामा औषध निर्माण कंपनीचा अधिकृत परवाना रद्द करण्याची मागणी भारतीय काँग्रेसच्या वतीने करण्यात आली.

यावेळी तालुक्यातील उपविभागीय कृषी कार्यालय येथील कृषी अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना काँग्रेसचे नेते दत्ता कांबळे यांनी चांगलेच धारेवर धरून,अदामा कंपनी सोबत तात्काळ पत्रव्यवहार करण्याचे सांगितले अन्यथा संविधानिक मार्गाने तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा सदरील निवेदनाद्वारे कृषी अधिकारी यांना देण्यात आला.यावेळी भारतीय काँग्रेसचे नेते दत्ता कांबळे सह नुकसानग्रस्त शेतकरी बाळासाहेब शेंडगे, नाथाभाऊ घडसे,उल्हास कदम,अशोक कांबळे,अंशीराम कांबळे,रामभाऊ डोंगरे,दत्ता कसबे, अविष्कार भिसे, भीष्मा लोखंडे सह भारतीय काँग्रेस पक्षाचे कार्यकर्ते उपस्थित होते.

# कृषी विभागातर्फे २५० मेट्रीक टन गोदाम बांधकामासाठी अर्ज करण्याचे अवाहन

बीड । प्रतिनिधी

अन्न आणि पोषण सुरक्षा -कडधान्य व राष्ट्रीय खाद्य तेल अभियान गळीत धान्य सन २०२४-२५ या वर्षात २५० मेट्रीक टन क्षमतेच्या गोदाम बांधकामासाठी प्राप्त लक्षांकाच्या अधीन राहून अर्ज मागविण्यात आले आहे. जिल्ह्यातील नोंदणीकृत शेतकरी उत्पादक कंपनी /संघ यासाठी पात्र असणार आहेत. अर्ज कसा करावा, आवश्यक कागदपत्रे : केंद्र शासनाच्या ग्रामीण भंडार योजना, नाबार्डच्या मार्गदर्शक सुचनांनुसार अर्जदारांनी प्रथम राष्ट्रीयीकृत बँकेकडे प्रस्ताव सादर करणे आवश्यक आहे. त्यानंतर बँकने कर्ज मंजूर केल्यानंतरच संबंधित अर्जदार कंपनी सदर बाबीच्या लाभास तालुका स्तरावर तालुका कृषी अधिकारी यांच्याकडे अर्ज करण्यास पात्र राहील. लाभार्थ्यांनी अर्ज करताना महाराष्ट्र राज्य वखार महामंडळाच्या प्राधिकृत अधिकारी अथवा सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मान्यता प्राप्त डिझाइन्स, स्पेसिफिकेशन्स व खर्चाच्या अंदाजपत्रकासह अर्ज तालुका कृषी अधिकारी यांचेकडे सादर करावा.

ज्या कार्यक्षेत्रात शेतकरी उत्पादक कंपनी /संघ आहे त्या तालुक्यातील तालुका कृषी अधिकारी कार्यालयात विहित प्रपत्रात अर्ज सादर करण्यात यावा. अर्जा सोबत शेतकरी उत्पादक कंपनीचे लेटर हेडवर अर्ज, शेतकरी उत्पादक कंपनीचे नोंदणी प्रमाणपत्र, शेतकरी उत्पादक कंपनीचे कमीटी ठराव, मागील तीन वर्षाचे शेतकरी उत्पादक कंपनीचे ताळेबंद लेखा अहवाल , ज्या जागेवर गोदाम उभारणी करण्याचे नियोजन आहे त्या जागेचा ७/१२ व ८-अ चा उतारा जोडण्यात यावा. अखेर आपले अर्ज कार्यक्षेत्रातील तालुका कृषी अधिकारी कार्यालयात कार्यालयीन वेळेत सादर करण्यात यावेत.

निवड झालेल्या शेतकरी उत्पादक कंपनीस आवश्यक कागद पत्राची छानननी नंतर पुर्वसंमती देण्यात येईल. पूर्व संमती भेटल्यानंतर गोदाम बांधकामास कार्यारंभ आदेश देण्यात येईल. निवड ते पूर्वसमती व पूर्व संमती ते काम पूर्णत्व यासाठी ज्या आर्थिक वर्षात पूर्वसंमती देण्यात आलेली आहे त्याच आर्थिक वर्षात गोदाम बांधकाम पूर्ण होणे अपेक्षित आहे.

गोदाम बांधकामाची क्षमता २५० मे. टन असुन अनुदान जास्तीत जास्त रु १२.५० लाख किंवा गोदाम बांधकामास आलेल्या खर्चाच्या ५० टक्के जे कमी असेल ते देय आहे. गोदामाचा वापर शेतकऱ्यांनी उत्पादित केलेला कृषी माल साठवणुकीसाठी शेतकऱ्यांना योग्य व माफक दरात उपलब्ध करून देणे अपेक्षित आहे. या बाबत रु.१०० च्या स्टॅप पेपरवर नोटराईज्ड हमी पत्र देणे बंधनकारक राहील. तरी जिल्ह्यातील इच्छुक व पात्र, जास्तीत जास्त नोंदणीकृत शेतकरी उत्पादक कंपनी/संघ यांनी आपल्या तालुक्यातील तालुका कृषि अधिकारी,कार्यालय येथे संपर्क करून गोदाम बांधकामासाठी अर्ज करण्यात यावेत असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी,बी.के.जेजुरकर यांनी केले आहे.

# सौर वीज निर्मिती केंद्रातून ४४ लाखाची चोरी

## परळी ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद

परळी । प्रतिनिधी

परळी तालुक्यातील वाघाळा येथील सोलर वीज निर्मिती केंद्रातील ४४ लाख रुपये किंमतीचा ऐवज चोरी गेल्याची घटना समोर आली असून या प्रकरणी कंपनीचे वरिष्ठ व्यवस्थापक यांच्या फिर्यादीवरून परळी ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.ग्रामीण भागात एवढ्या मोठ्या रकमेचा ऐवज चोरी झालाच कसा ह्यावर तर्कवितर्क लावले जात आहेत.

पोलीस सूत्राकडून मिळालेल्या माहितीनुसार परळी तालुक्यातील वाघाळा येथील सोलर एज पॉवर अँड एनर्जी ली च्या सौर वीज निर्मिती केंद्रातील पॉलीकॅप कंपनीची ४ स्के.एमएम डीसी केबल ज्याची लांबी ६० किलोमीटर असलेली, १६ स्के. एमएम आर्थिंग केबल ६८ मीटर लांबी असलेली, २००० स्के कनेक्टर, १६ स्के एमएम ३४ लंग्ज असा तब्बल ४४ लाख २३ हजार रुपयांचा ऐवज शनिवार दि ६ जुलै रोजी रात्री ८ ते रविवार दि ७ जुलै रोजी सकाळी ६ च्या दरम्यान अज्ञात चोरट्यानी लंपास केला.दरम्यान एवढ्या मोठ्या चोरी प्रकरणी कंपनीचे वरिष्ठ व्यवस्थापक सुधाकर त्रिभुवननाथ शुक्ला (वय ५५ ) यांच्या फिर्यादीवरून परळी ग्रामीण पोलीस ठाण्यात गुरनं २०५/२०२४ कलम ३०३(२) बीएनएस कायद्यानव्ये अज्ञात चोरट्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून या प्रकरणी अधिक तपास ठाण्याचे कर्मचारी रामचंद्र केकान हे करत आहेत.

# कडधान्य योजने अंतर्गत बीज प्रक्रिया संचसाठी अर्ज करण्याचे अवाहन

बीड । प्रतिनिधी

अन्न आणि पोषण सुरक्षा - कडधान्य योजना सन २०२४-२५ या वर्षात बीज प्रक्रिया संच प्राप्त लक्षांकाच्या अधीन राहून अर्ज मागविण्यात येत आहेत. जिल्ह्यातील नोंदणीकृत शेतकरी उत्पादक कंपनी /संघ.लाभार्थी शेतकरी उत्पादक कंपनी /संघ यांनी राष्ट्रीयकृत बँकेकडे प्रकल्प सादर करावा. बँकेने कर्ज मंजूर केल्या नंतर संबंधित शेतकरी उत्पादक कंपनी/संघ सदर बाबीच्या लाभास पात्र राहील.सदर पात्र शेतकरी उत्पादक कंपनी/संघ तालुका स्तरावर तालुका कृषी अधिकारी यांचेकडे अर्ज करण्यास पात्र राहतील.

लाभार्थी शेतकरी उत्पादक कंपनी/संघ अर्ज करताना ज्या कार्यक्षेत्रात शेतकरी उत्पादक कंपनी /संघ आहे त्या तालुक्यातील तालुका कृषी अधिकारी कार्यालयात विहित प्रपत्रात अर्ज सादर करण्यात यावा. अर्जा सोबत शेतकरी उत्पादक कंपनी/संघचे लेटर हेडवर अर्ज, शेतकरी उत्पादक कंपनी चे नोंदणी प्रमाणपत्र, शेतकरी उत्पादक कंपनी/संघचे कमीटी ठराव, मागील तीन वर्षाचे शेतकरी उत्पादक कंपनी/संघचे / , ज्या जागेवर बीज प्रक्रिया संच उभारणी करण्याचे नियोजन आहे त्या जागेचा ७/१२ व ८-अ चा उतारा जोडण्यात यावा दि.३१ जुलै २०२४ अखेर आपले अर्ज कार्यक्षेत्रातील तालुका कृषी अधिकारी कार्यालयात कार्यालयीन वेळेत सादर करण्यात यावेत.

निवड झालेल्या शेतकरी उत्पादक कंपनीस आवश्यक कागद पत्राची छाननी नंतर पुर्वसमती देण्यात येईल. पूर्व संमती भेटल्यानंतर बीज प्रक्रिया संच उभारणीस कार्यारंभ आदेश देण्यात येईल. निवड ते पूर्वसमती व पूर्व संमती ते काम पूर्णत्व यासाठी ज्या आर्थिक वर्षात पूर्वसंमती देण्यात आलेली आहे त्याच आर्थिक वर्षात बीज प्रक्रिया संच प्रकल्प पूर्ण होणे अपेक्षित आहे.बीज प्रक्रिया प्रकल्प उभारणीस (यंत्र सामग्री व बांधकामासाठी ) प्रत्यक्ष खर्चाच्या ५० टक्के किवा रु.१०.०० लाख यापैकी जे कमी असेल ते अनुदान देय आहे.तरी जिल्ह्यातील इच्छुक व पात्र, जास्तीत जास्त नोंदणीकृत शेतकरी उत्पादक कंपनी/संघ यांनी आपल्या तालुक्यातील तालुका कृषि अधिकारी,कार्यालय येथे संपर्क करून बीज प्रक्रिया संच उभारणीसाठी अर्ज करण्याचे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, बी. के. जेजुरकर यांनी आहे.

# दोषी असलेल्या पोलीस कर्मचाऱ्यांवर कडक कारवाई करा - नवीदोद्दीन सिद्दिकी

माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यात तसेच शहरात गेल्या काही दिवसांपासून पोलिसांची कारवाई ही मुस्लिम समाजा सोबत दुजाभाव दाखविणारी दिसून येत आहे नुकतेच दिंद्रुड येथे कब्रस्तानात मयत दफन करण्यावरून सुद्धा पोलिसांनी चुकीच्या पद्धतीने प्रकरण हाताळले तसेच समाज बांधवांना विनाकारण त्रास देऊन उचलून ठाण्यात डांबले या सर्व प्रकरणांची उच्च पातळीवर नोंद घेऊन पोलिसांची मनमानी थांबवावी अन्यथा रस्त्यावर उतरून मोठे आंदोलन छेडू असा इशारा मुस्लिम संघर्ष विकास मोर्चाचे संस्थापक अध्यक्ष नवीदोद्दिन सिद्दिकी यांनी प्रसिद्धीपत्रकातून दिला आहे.

आधी दफनविधी रोखला. पुन्हा षडयंत्रद्वारे मुस्लिम समाजाला टार्गेट करून मौलवी व धर्मगुरू व माजलगावातले काही वरिष्ठ मान्यवरांवर सह ७० ते ७५ लोकांवर खोटे गुन्हे दाखल केले. युवकांवर अतिरेकी सारखे संशय व्यक्त करून त्यांचे व्हिडिओ चित्र मोबाईल तोंडासमोर लावून वयस्कर व युवकांचा शूटिंग घेतल्या जात आहे. शांततेत संयम राखून शासनाच्या दारी आपल्या हक्कासाठी येणाऱ्या नागरिकांसोबत जर माजलगाव पोलीस प्रशासन असा अतिरेकी सारखा व्यवहार मुस्लिम समाजा सोबत करीत असेल तर जनता खपवून घेणार नाही. यामुळे जनतेमध्ये पोलिसांविरोधात नाराजगी व आक्रोशाचे वातावरण निर्माण झाले आहे व चर्चा होत आहे. कब्रस्तानच्या जागेचे गॅजेट असुन सातबारासह वक्फ बोर्डातही त्याची नोंद आहे. शेकडो वर्षांपासून त्या जागी कब्रस्तान असतांनाही तेथील काही समाजकंटक पुढारी लोक, तहसील आणि पोलीस प्रशासनाने ही कारवाई केली आहे. माजलगाव पोलीस प्रशासन कोणाच्या इशाऱ्यावर मुस्लिम समाजा सोबत छळ करीत आहे? याची चौकशी वरिष्ठ आयुक्ताद्वारे करून संबंधीत पोलीस कर्मचाऱ्यांवर गुन्हा दाखल करण्यात यावा. अन्यथा रस्त्यावर उतरून मोठे आंदोलन छेडू असा इशारा मुस्लिम संघर्ष विकास मोर्चाचे संस्थापक अध्यक्ष नवीदोद्दिन सिद्दिकी यांनी प्रसिद्धीपत्रकातून दिला आहे.

# विद्यार्थ्यांनी लैंगिक शोषणाबाबत आम्हांना माहिती द्यावी: जी.जी. सोनी



बीड । प्रतिनिधी

विद्यार्थ्यांनी लैंगिक शोषणाबाबत न घाबरता आपल्या अम्हांना माहिती द्यावी असे आवाहन विधी सेवा प्राधिकरणचे सचिव जी.जी. सोनी यांनी सेंट ॲन्स शाळा येथे झालेल्या बालकांचे लैंगिक शोषणापासून संरक्षण कायदा २०१२ या विषयी जनजागृती कार्रक्रमात केले. दिनांक १० जुलै २०२४ रोजी सकाळी ९.०० वाजता किमान समान कार्यक्रमाअंतर्गत प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा अध्यक्ष जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे आनंद एल. यावलकर बीड यांच्या मार्गदर्शनाखाली ''बालकांचे लैंगिक शोषणापासून संरक्षण कायदा २०१२'' या विषयी सेंट ॲन्स स्कूल, जालना रोड, बीड येथे जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

ते पुढे म्हणाले, बालकांनी आपल्यासोबत अथवा आपल्या मित्र मैत्रिणींसोबत अशी घटना घडल्यास अशा प्रसंगी घाबरून किंवा गोंधळून न जाता आपल्या विश्वासातील व्यक्तीला, पालकांना, शिक्षकांना सांगावे व अशा घटनांपासून सावध रहावे, असे मार्गदर्शनपर बोलताना सांगितले. या कार्यक्रमाची प्रस्तावना सेंट ॲन्स स्कूलच्या मुख्याध्यापिका सिस्टर रोस्मीन यांनी केली तसेच कार्यक्रमाचे महत्व विद्यार्थ्यांना विषद केले. या कार्यक्रमास बालकल्याण समिती, बीडचे अध्यक्ष अशोक तांगडे यांनी गूड टच आणि बॅड टच यासंबंधीत माहिती विद्यार्थ्यांना समजेल अशा सोप्या भाषेत सांगितली जसे की, आई वडील आजी आजोबा बहिण भाऊ डॉक्टर शिक्षक यांनी काळजीपोटी केलेला टच गूड टच असतो. तर जो स्पर्श तुम्हाला आवडत नाही. ज्या स्पर्शामुळे तुम्ही घाबरून जाता, गोंधळून जाता, तुम्हाला वाईट वाटते असा प्रत्येक स्पर्श हा बॅड टच असतो. कधी कधी खूप जवळचा व्यक्ती सुध्दा असा बॅड टच करू शकतो. असा टच झाल्याबरोबर बालकाने त्या व्यक्तीपासून दूर जावे व घडलेली बॅड टचची घटना आई वडिल शिक्षक किंवा विश्वासातील जवळच्या माणसाला सांगावी, असे अवाहन बालकल्याण समितीचे अध्यक्ष अशोक तांगडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना केले. कायद्याचे सजग नागिरक निर्माण करण्याचे कार्य विधी सेवा प्राधीकरणाच्या वतीने केले जाते. आपले राष्ट्र जर कायद्याने सजग झाले तर कायदा पाळणारांची संख्या वाढेल व गुन्हेगारांचे प्रमाण कमी होईल. हाच उद्देश घेऊन विधी सेवा प्राधिकरण कार्य करीत आहे. कोणत्याही बालकाला अडचणीच्या वेळी मदत हवी असेल तर मुलांनी १०९८ यां क्रमांकावर फोन करून कळवावे, असे विधीदूत तत्वशील कांबळे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले. कार्यक्रमास विधीदूत मिथून जोगदंड, तसेच सेंट ॲन्य स्कूल मधील शिक्षक व विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.


## जाहीरनामा

**मा.श्रीमती एफ.बी.बेग सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर बीड़ ता. जि. बीड यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज नंबर ८७०/२०२४**

**वि. शामल कोणीही नाही-विधीज्ञ व्ही. एस. फाटक**

मागणीः- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट, १८२७ चे कलम २ प्रमाणे वारस हक्क प्रमाणपत्र मिळणे बाबत. अर्जदारः १) शामल शरद पवार, वय ३२ वर्षे, धंदा घरकाम, २) स्वरा शरद पवार अ.पा.क. आई अर्जदार क्र. १, ३) श्रेया शरद पवार अ.पा.क.आई अर्जदार क्र. १, ४) आशाबाई उत्तम पवार, वय ६० वर्षे, धंदा घरकाम, राहणार सर्व - मैंदा ता.जि.बीड

विरुध्द निरंक

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात यांचे वारस असल्या बाबतचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे. ज्याअर्थी **मयत नामे शरद पि उत्तम पवार** हे राहणार मैंदा ता.जि. बीड हे दिनांक १७/१२/२०२३ रोजी मैंदा ता जि. बीड येथे मयत झालेले आहेत. अर्जदार ही मयत नामे शरद पि उत्तम पवार यांची पत्नी असुन अर्जदार क्र. २ व ३ मुली तर अर्जदार क्र. ४ ही मयताची आई आहे. मयत नामे शरद पि उत्तम पवार यांचे निधन झालेले आहे. मयताचे नंतर अर्जदार यांना शासकीय, निमशासकीय व कार्यालयीन उपयोगाकरीता सदर वारस प्रमाणत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार सदरहु मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्यांनी कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट सदरहु अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिल्यास त्यांना सदरहु मयत शरद पि उत्तम पवार यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**सदर प्रकरणात पुढील तारीख ३१/०७/२०२४ आहे. आज दिनांक २८/०६/२०२४ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्याने दिले.**

आदेशावरून
स्वाक्षरित
क लिपीक
सह दिवाणी न्यायालय व स्तर बीड
शिक्का
**अधिक्षक**
दिवाणी न्यायालय व. स्तर बीड

# आष्टी मतदारसंघात २५ कोटी रु.किमतीच्या रस्ते कामांना मंजुरी -माजी मंत्री सुरेश धस

**आष्टी । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्याचे माजी राज्यमंत्री विधान परिषदेचे आमदार सुरेश धस यांनी आपल्या विधान परिषद सदस्यत्वाची मुदत संपत असताना विधानसभा मतदारसंघातील रस्ते कामांना मंजुरीचा मास्टर स्ट्रोक मारला असून या कामांना मंजुरी दिल्याबद्दल सुरेश धस यांनी मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे आभार मानले आहेत.

आमदार सुरेश धस यांची धाराशिव तथा लातूर बीड स्थानिक प्राधिकारी मतदार संघ धाराशिव या मतदारसंघाचे विधान परिषद सदस्य म्हणून मुदत संपली असली तरी त्यांनी शेवटच्या टप्प्यात देखील आष्टी विधानसभा मतदारसंघातील रस्तेकामांसाठी शासनाकडून निधी खेचून आणला आहे पुरवणी अर्थसंकल्पामध्ये आष्टी विधानसभा मतदारसंघातील विविध रस्ते कामांसाठी २५ कोटी रुपये निधी मंजूर करण्यात आला आहे अशी माहिति सा.बा.विभाग स्वीय सहाय्यक विनोद रोडे यांनी माहिती दिली आहे. यामुळे अनेक ठिकाणच्या प्रतीक्षेत असलेल्या रस्ते कामांचा कायमस्वरूपी प्रश्न मिटणार आहे. नव्याने मंजूर करण्यात आलेली रस्त्यांची कामे पुढील प्रमाणे आहेत



१) जिल्हा सरहद्द पाथर्डी, रस्त्यावर माळेवाडी ते पाटसरा रस्ता करणे. ७ कोटी २) रामा-७०ते मोराळा वनवेवडी रस्ता करणे. ५ कोटी ३) सावरगाव मच्छिंद्रनाथ गड रस्ता ते शेंडगेवाडी जोडरस्ता करणे.- ४ कोटी ४)आष्टी शहरात कन्या शाळा ते माऊली मंदिरापर्यंत सिमेंट काँक्रेट रस्ता करणे - ५ कोटी ५)आष्टी शहर ते जुना पिंप्री रस्ता करणे. (आष्टी-शिराळा रस्त्यापर्यंत) - ४ कोटी गेल्या अनेक दिवसापासून च्या मागणीनुसार या रस्ता कामांना मंजुरी दिल्याबद्दल पूर्व आमदार सुरेश धस यांनी राज्याचे लोकप्रिय मुख्यमंत्री मा. एकनाथजी शिंदे,उपमुख्यमंत्री मा. देवेंद्रजी फडणीस, उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री मा.अजितदादा पवार , सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण यांचे विशेष आभार मानले आहेत.

# शिंपोरा ते खुंटेफळ उपसा सिंचन योजनेसाठी दिडशे कोटी मंजुर

## आ. बाळासाहेब आजबे यांच्या मागणीला यश

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्याची दुष्काळी ओळख पुसून टाकण्यासाठी शिंपोरा ते खुंटेफळ उपसा सिंचन योजना महत्वाची मानली जात आहे. या योजनेच्या कामासाठी आ. बाळासाहेब आजबे हे नियमित पाठपुरावा करत आहेत. त्यांच्या पाठपुराव्याला यश आले असुन सुरू असलेल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात या योजनेसाठी सरकारने १५० कोटी रूपये मंजुर केले आहेत.



आष्टी तालुका हा नेहमीच दुष्काळी तालुका म्हणुन ओळखला जातो. त्यामुळे तालुक्यात शाश्वत सिंचनाची सोय व्हावी यासाठी शिंपोरा ते खुंटेफळ उपसा जलसिंचन योजना हि महत्वाकांक्षी योजना मानली जात आहे. या योजनेचे प्रत्यक्ष काम सुरू व्हावे यासाठी आ. बाळासाहेब आजबे हे नियमित पाठपुराव करत आहेत. सुरू असलेल्या अधिवेशनात या योजनेसाठी सरकारने १५० कोटी रूपये मंजुर केले आहेत. हि योजना पुर्ण झाल्यानंतर तालुक्याचा दुष्काळी असलेला कलंक पुसेल.

आष्टी तालुक्यासाठी महत्वकांक्षी असणारी आष्टी उपसा सिंचन योजनेसाठी दोन दिवसापूर्वीच आमदार बाळासाहेब आजबे काका यांनी विधानसभेत आष्टी उपसा सिंचन योजनेसाठी निधीची तरतूद करण्यात यावी अशी मागणी केली होती त्यामागनुसार राज्याचे मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे साहेब उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजितदादा पवार व उपमुख्यमंत्री तथा जलसंपदा मंत्री देवेंद्रजी फडणवीस साहेब व कृषी मंत्री धनंजय मुंडे साहेब यांनी या योजनेसाठी निधीची तरतूद केल्याबद्दल आष्टी तालुक्यातील ◀◀ पान ३ वर



**माजलगाव : कृषी उत्पन्न बाजार समितीने छत्रपती शिवाजी महाराज व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकास मान्यता दिल्याबद्दल सभापती जयदत्त (आण्णा )नरवडे, उपसभापती श्रीहरी (नाना )मोरे यांचा सत्कार करतांना सतीश रांजवन, राजेश रांजवण, रामराजे रांजवण अनिकेत रांजवण,दत्ता रांजवन, हभीमराव टाकणखार व समवेत संचालक नंदकिशोर सजगणे,भागवतराव शेजुळ,अमोल जाधव**

# धारुरमध्ये ऑटो रिक्षा युनीयनची जनजागृती फेरी

**किल्लेधारूर । प्रतिनिधी**

मराठा आरक्षणा साठी बीड येथे११ जुलै रोजी आयोजीत शांतता रॅलीसाठी धारूर मध्ये ऑटो रिक्षा युनीयनच्या वतीने जनजागृती फेरी काढण्यात आली यांला उस्फुर्त प्रतीसाद मिळाला.मोठ्या संख्येने शांतता रॅलीसाठी जाण्याचा निर्धार करण्यात आला.

सकल मराठा समाज बांधवाचे वतीनै११जुलै रोजी बीड येथे मनोज जंरागे पाटील यांचे नेतृत्वा खाली शांतता रॅली काढण्यात येणार आहे या साठी धारूर शहरातील ऑटोरिक्षा युनीयन चे वतीने मुख्य रस्त्यावर व शहरात जनजागृती फेरीअध्यक्ष शाहूराव चव्हाण व उपाध्यक्ष सुरेश बप्पा शेळके यांचे नेतृत्वा खाली काढण्यात आली व मोठ्या संख्येने सहभागी होण्याचा निर्धार करण्यात आला.

# आषाढी कार्तिक विसरू नका मज ! सांगतसे गुज पांडुरंग नारायणगड पंढरपूर दिंडीचे राजेंद्र मस्केंनी केले स्वागत

**बीड । प्रतिनिधी**

गेली शेकडो वर्षापासून श्री क्षेत्र नारायणगडाची पंढरपूर आषाढी वारीची परंपरा आजही मोठ्या उत्साहात जतन केली आहे. श्री. क्षेत्र नारायणगडाचे महंत प्रेममूर्ती ह.भ.प. शिवाजी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली नारयणगड येथून हजारो वारकऱ्यांसह दिंडीचे परवा पंढरपुरकडे प्रस्थान झाले. भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी वैद्यकिन्ही येथे दिंडीचे स्वागत करून महाराजांचे आशीर्वाद घेतले. भरपूर पाऊस, उत्तम पिक पाणी आणि बळीराजाला सुख लाभूदे असे साकडे पांडुरंगाला घालून दिंडीला निरोप दिला.

पंढरीची वारी हा पृथ्वीतलावरील अभूतपूर्व सोहळा म्हणजे कल्याण, आत्मिक ◀◀ पान ३ वर



# राष्ट्रीय महामार्गाचे कर्तव्यशुन्य अधिकारी यांना बडतर्फ करा -ज्ञानेश्वर चौधरी

## संबंधित अधिकाऱ्यांची बांधकाम मंत्र्यांकडे तक्रार करणार

**म्हसोबावाडी । प्रतिनिधी**

गेल्या दीड वर्षांपासून साबलखेड ते आष्टी या राष्ट्रीय महामार्गाचे काम अतिशय मंद कासवगतीने सुरू आहे.या रस्त्यावरील सर्वात मोठे चार पुल आहेत,परंतु कडा येथील कडी नदीवरचा सर्वात मोठा पुल आहे. या पुलाचे काम पावसाळाच्या



अगोदरच पूर्ण होणे गरजेचे होते यासाठी माजी राज्यमंत्री आमदार सुरेश धस यांनी यासंदर्भात वेळोवेळी संबंधित अधिकारी यांना सूचना देखील दिल्या होत्या यावेळी प्रशासकीय अधिकाऱ्यांनी मोठ्या दिमाखात आश्वासन देखील दिले होते,परंतु राष्ट्रीय महामार्गाचे कर्तव्यशून्य अधिकारी व संबंधित ठेकेदार यांनी मात्र या कडे सोयीस्कर दुर्लक्ष करून पावसाळ्याच्या तोंडावरच काम सुरू केले मात्र हे कामही रस्त्याच्या कामासारखे मंद गतीने सुरू आहे. काम सुरू असताना संबंधीत ठेकेदाराने पर्यायी मार्ग म्हणून एवढ्या मोठ्या नदीवर फक्त दोन नळ्याच्या ◀◀ पान ३ वर

# पाणी, रस्त्याच्या प्रश्नासह चोरांचा बंदोबस्त करा -रंजीत बनसोडे

**बीड । प्रतिनिधी**

प्रभाग क्र.२४ चे नगरसेवक रणजित बनसोडे यांनी प्रभागातील पाणी प्रश्न, रस्त्याचा प्रश्न तसेच वाढत्या चोर्यांबाबत नागरिक भयभीत झाले आहेत तसेच संबंधित विभागाचे अधिकारी यांना याबाबत लेखी निवेदन देवून देखील कसलीही कार्यवाही न झाल्याने जिल्हाधिकारी यांनी आपल्या स्तरावुन प्रश्न सोडवण्याची विनंती केली आहे.

पुढे दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, १५ ते १८





दिवसाला सुटणारे पाणी हा जिव्हाळ्याचा प्रश्न, धानोरा रोडच्या रस्त्याचा प्रश्न, अंकुश नगरच्या रस्त्याचा प्रश्न आणि वाढत्या चोर्यांबाबत संबंधित विभागाच्या अधिकारी यांना पाठपुरावा केला होता परंतू हे प्रश्न न सुटल्याने जिल्हाधिकारी यांनी याबाबत लक्ष घालावे अशी विनंती केली. व धानोरा रोड व अंकुश नगर रस्ता हे महत्वाचे प्रश्न सुटत नसल्याने खंत वाटत असून नागरिकाचा रस्त्याचा ◀◀ पान ३ वर

# खंडू मामा गाडवे यांचे निधन

घाटनांदुर प्रतिनिधी :- येथील खंडू (अण्णा) बाबुराव गाडवे (वय ८५) यांचे दि ९ जुलै रोजी रात्री ९ वा निधन झाले त्याचयावर अंत्यसंस्कार १० जुलै बुधवार रोजी सकाळी ११ वा धनगर समाज समशान भूमी येथे करण्यात आले. त्यांच्या पश्चात दोन मुले , एक मुलगी, सुना ,नातवंडे असा मोठा परिवार आहे.



# घागरवाड्यात सर्वज्ञ करिअर अकॅडमी व भारतीय सेनेने केले ५००० रोपांचे वृक्षारोपण

**किल्लेधारूर । प्रतिनिधी**

घागरवाडा येथे भारतीय सेनेच्या १३६ इको बटालीयन व केज येथील सर्वज्ञ करिअर अकॅडमीचे विद्यार्थ्यांनी पाच हजार वृक्षाची लागवड केली या उपक्रम उत्कृष्ट पध्दतीने राबवला

केज येथील सर्वज्ञ करिअर अकॅडमी च्या विद्यार्थ्यांनी व शिक्षक वृंदानी भारतीय सेनेच्या बि कंपनी १३६ इको बटालियन बरोबर धारुर तालुक्यातील घागरवाडा




येथील वन विभागाच्या जमिनीत ५००० रोपांचे वृक्षारोपण केले.

बी कंपनी १३६ इको बटालियन ची तुकडी भारतीय सेनेची पर्यावरण संवर्धन करणारी तुकडी आहे. ही बटालियन वर्ष २०२४-२०२५ मध्ये बीड जिल्ह्यात ◀◀ पान ३ वर

# जप्त मोटरसायकल सोडण्यासाठी ऑनलाईन लाच घेणे आले आंगलट

माजलगाव । प्रतिनिधी

येथील तहसिलदार यांनी गेल्यावर्षी अवैध वाळू वाहतूक व उत्खनन करणाऱ्या वाहनांचे लोकेशनसाठी करणाऱ्यां संशयावरून मोटरसायकल जप्त केली होती,सदर जप्त मोटरसायकल सोडण्यासाठी तहसीलदार व गैणखनीज अव्वल कारकून यांनी ऑनलाईन फोन पे व गुगल पे वरुन लाच घेतल्याप्रकरणी महाराष्ट्र पत्रकार संघाच्या वतीने दि २५ मे २०२४ रोजीच्या दिलेल्या तक्रारीवरुन तहसीलदार व गैणखनीज अव्वल कारकून यांच्या चौकशीचे आदेश जिल्हाधिकारी यांनी दि २६ जुन २०२४ रोजी अतिरिक्त जिल्हाधिकारी अंबाजोगाई यांना दिले असुन याप्रकरणी तहसीलदार व गैणखनीज अव्वल कारकून यांची अतिरिक्त जिल्हाधिकारी अंबाजोगाई यांनी चौकशी सुरु केलेली असुन तहसील कार्यालयात जप्त असलेली मोटरसायकल सोडण्यासाठी तहसीलदार व गैणखनीज अव्वल कारकून यांना ऑनलाईन लाच स्विकारने चांगलेच अंगलट आले आहे.

# लाडकी बहिण योजनेअंतर्गत आ.आजबे यांच्या नेतृत्वाखाली तागडखेल युवकांनी घेतला पुढाकार

म्हसोबावाडी । प्रतिनिधी

सद्या महाराष्ट्र भर चालु झालेली लाडकी बहिण योजनेअंतर्गत सर्वत्र या योजनेसाठी लागत असणारे कागदपत्रे तयार करुन आपल्या घरातील महिलेचे नाव या लाडकी बहिण या योजनेसाठी ऑनलाइन अर्ज करत आहेत याच योजनेअंतर्गत आष्टी तालुक्यातील तागडखेल गावांमध्ये माझी लाडकी बहिण या योजनेसाठी लागणारी संपूर्ण माहीती मा. आमदार बाळासाहेब आजबे यांचे युवा कार्यकर्त्या मार्फत उत्कृष्ट पद्धतीने जन जागृती करुन व. महीलांना अर्ज भरण्यासाठी मदत



करणे. चे समाज कार्य तागडखेल येथे सचिन गव्हाणे, सचिन शिरसाठ नरेंद्र गव्हाणे,निलेश चव्हाण, गणेश गव्हाणे सह गहिनीनाथ गव्हाणे करत आहेत.व प्रत्येक गावातुन तरुण वर्गाने समोर येऊन प्रत्येक महिलेचा लाडकी बहिण या योजनेसाठी अर्ज ऑनलाइन भरण्यासाठी वडीलधाऱ्या महिलांना मदत करावी असे आव्हान आ.आजबे यांचे एकनिष्ठ युवा कार्यकर्ते सचिन गव्हाणे यांनी केले आहे.

# ढगाळ वातावरणामुळे सोयाबीनवर अळीचा प्रादुर्भाव; योग्य कीटकनाशक वापरून करा व्यवस्थापन

## सोयाबीन पिकाचे करा एकात्मिक कीड रोग अन्नद्रव्य व्यवस्थापन : शिवप्रसाद येळकर

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

सद्यस्थितीत मागील आठवड्यातील ढगाळ वातावरणामुळे सोयाबीन पिकावर हिरव्या अमेरिकन बोंडअळीचा प्रादुर्भाव होऊन सोयाबीनची पाने कुरतडून खाल्याचे निदर्शनास येत आहे. शेतकरी सदर अळीच्या व्यवस्थापनासाठी शिफारस नसलेली कीटकनाशके वापरत आहेत त्यामुळे अळीचे व्यवस्थापन होत नसल्याचे दिसून येत आहे त्यामुळे दुबार फवारणी करण्याची वेळ शेतकऱ्यांवर येऊन उत्पादन खर्च वाढत आहे. सोयाबीन पिकामधील सद्यस्थितीत निदर्शनास येत असलेल्या हिरव्या अमेरिकन बोंडअळीचे व्यवस्थापन



करण्यासाठी क्लोरँट्रानिलीप्रोल ९.३% अधिक लँबडा सायहॅलोथ्रीन ४.६% झेडसी पूर्वमिश्रित कीटकनाशक ८० मिली किंवा क्लोरँट्रानिलीप्रोल १८.५ एससी ६० मिली किंवा टेट्रानिलीप्रोल १८.१८% एससी १०० मिली किंवा इमामेक्टीन बेन्झोएट १.९% ईसी १०० मिली किंवा आयसोसायक्लोसिरम ९.२% डीसी १२० मिली किंवा फ़्ल्युबेन्डामाईड २०% डब्ल्युजी १०० ग्रॅम किंवा फ़्ल्युबेन्डामाईड ३९.३५% एससी ६० मिली किंवा इन्डोक्झाकार्ब १५.८% ईसी १२० मिली किंवा प्रोफेनोफॉस ५०% ईसी ४०० मिली यापैकी कोणत्याही एका कीटकनाशकाची २०० लिटर पाण्यामध्ये मिसळून एक एकर क्षेत्रासाठी फवारणी करावी. काही ठिकाणी ढगाळ वातावरणामुळे अन्नद्रव्य निर्मितीस अडथळा ◀◀ पान ३ वर

# जिल्ह्यात खतांची कृत्रिम टंचाई निर्माण करणाऱ्या दुकानदारांचा परवाना रद्द करा : जगताप, मुळूक

## कृषि विभागाने दक्ष राहावे; शेतकऱ्यांनी शिवसेनेकडे तक्रार करावी

**बीड । प्रतिनिधी**

जिल्ह्यात जूनमध्ये शेतकऱ्यांच्या दृष्टीने समाधानकारक पाऊस असल्याने शेतकरी विविध प्रकारच्या खरीपाची पेरणी करण्यात शेतकऱ्यांची लगबग सुरू आहे. खते खरेदीसाठी बाजारात शेतकऱ्यांची बाजारात पुन्हा गर्दी आहेत. कृषी दुकानदारांकडून या संधीचा फायदा घेण्याच्या दृष्टीने खतांची कृत्रिम टंचाई निर्माण करुन शेतकऱ्यांची लूट करण्यात येते. यामुळे कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांनी खतांची कृत्रिम टंचाई निर्माण होणार नाही यासाठी





उपाययोजना करावी व कृत्रिम टंचाई निर्माण करणाऱ्यांवर कडक कार्यवाही करावी अशी मागणी शिवसेनेचे जिल्हाप्रमुख अनिल जगताप, सचिन मुळूक यांनी केली आहे.

दरम्यान असे प्रकार उघडकीस आल्यास शेतकऱ्यांनी शिवसेनेशी संपर्क साधवा असे आवाहनही जगताप, मुळूक यांनी केले आहे.

जून महिना सुरू होताच बि-बियाणे खरेदीसाठी शेतकऱ्यांनी बाजारात गर्दी केली होती. या काळात कृषी विक्रेत्यांकडून वाढीव दराने बियांणांची विक्री गेली. सध्या बीड जिल्ह्यात सध्या पेरणी योग्य पाऊस पडल्याने शेतकरी सुखावला असून पेरणीच्या कामाला लागला आहे. पेरणीची कामे उरकत ◀◀ पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# अपघात रोखण्यासाठी ब्लॅक स्पॉटवर तातडीने कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात- जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे जिल्ह्याच्या ग्रामीण भागासह शहरातील रस्त्यावरील अपघात रोखण्यासाठी सतत अपघात होणाऱ्या ठिकाणी (ब्लॅक स्पॉट) संबंधित विभागाने तातडीने कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात, असे निर्देश जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित जिल्हा रस्ता सुरक्षा समितीच्या बैठकीत ते बोलत होते. यावेळी पुणे शहर वाहतूक शाखेचे पोलीस उपायुक्त रोहिदास पवार, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता बाप्पा बहिर, भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे योगेश्वर डी., पुणे मनपाचे वाहतूक नियोजक निखील मिझार, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या उप अभियंता एम. डी. कजरेकर आदी उपस्थित होते.

श्री. दिवसे म्हणाले, अपघात रोखण्यासाठी ब्लॅक स्पॉटवरची उपाययोजना खूप महत्वाची आहे.

वारंवार अपघात होणाऱ्या ठिकाणांचा डेटा तयार ठेवावा. डेटाच्या आधारे उपाययोजनानंतर ब्लॅक स्पॉटवर किती अपघात कमी झाले, अपघात कोणत्या वेळी झाले याची माहिती मिळण्यास मदत होईल. सार्वजनिक बांधकाम विभाग, भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, महानगरपालिका यांनी रस्त्याचे काम चांगल्या दर्जाचे करावे, तसेच अल्पकालीन आणि दीर्घकालीन योजना आखाव्यात.

संबंधित विभागाने आवश्यकतेनुसार रस्त्यावर रम्बलर्स बसविणे, सूचना फलक, रोड मार्किंग्ज, रस्त्यावरील परावर्तक, झेब्रा क्रॉसिंग, ब्लिंकर्स, रिफ्लेक्टर्स आदी बसविण्याची कार्यवाही करावी. दर तीन महिन्यांनी रोड मार्किंग्ज, रस्त्यावरील परावर्तक, झेब्रा क्रॉसिंग, साईड पट्ट्या रंगविण्यात याव्यात. रस्त्यावरील सुरक्षा विषयक उपाययोजना करण्यासाठी निधी उपलब्ध करून देण्यात येईल. भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने महामार्गावर स्वच्छतागृहे, शौचालये यासारख्या सोयीसुविधा उपलब्ध कराव्यात.

पुणे शहरात होणाऱ्या अपघातामध्ये दुचाकीस्वार आणि पादचारी यांची संख्या अधिक आहे. वाहतुक विभागाने अपघात कमी करण्यासाठी रस्ता वाहतुक नियम तसेच सुरक्षिततेच्या दृष्टिने उपाययोजना कराव्यात. भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण विभागाने चांदणी चौकात वाहनचालकांना समजेल आणि दिसेल असे फलक रस्त्यावर लावावेत. शालेय विद्यार्थ्यांची वाहतूक करणारी वाहने, वाहनचालक यांची संबंधित विभागाने नियमित तपासणी करावी, अशा सूचनाही जिल्हाधिकाऱ्यांनी यावेळी दिल्या.

पुणे जिल्ह्यात ३९ ब्लॅक स्पॉट्स आहेत असे यावेळी श्री. बहीर यांनी सांगितले. जिल्हाधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली अपघात कमी करण्याच्यादृष्टीने अनेक उपाययोजना करण्यात आल्याने अपघातांचे प्रमाण कमी झाल्याचेही त्यांनी सांगितले. बैठकीत 'ब्लॅक स्पॉट' दुरुस्तीबाबत आढावा घेण्यात आला. यावेळी सार्वजनिक बांधकाम विभाग, पुणे महानगरपालिका, युनिसेफ व आयरॅड संस्थेच्यावतीने सादरीकरण करण्यात आले.



# शिक्षक समितीच्या वतीने वारकऱ्यांना अल्पोपहार वाटप

पुणे । प्रतिनिधी

दि.९ जुलै २०२४- शिक्षक समिती निमगाव केतकी यांचे वतीने जगतगुरू संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्यातील वारकरी बांधवांना अल्पोपहार वाटप करण्यात आले. गेली दहा वर्षापासून अखंडितपणे शिक्षक समिती परिवारातील प्राथमिक शिक्षकांनी हा उपक्रम सुरू ठेवला आहे. शैक्षणिक सेवेसोबत वैष्णव भक्तांची सेवा करण्याचा आनंद काही औरच असे मत शिक्षकांनी व्यक्त केले. यावेळी शिक्षक पतसंस्थेचे माजी चेअरमन किरण म्हेत्रे , अरूण मिरगणे , संचालक प्रताप शिरसट , शिक्षक समिती कोषाध्यक्ष भारत ननवरे ,जुनी पेन्शन संघटनेचे मा. अध्यक्ष संतोष हेगडे,नवनाथ जाधव , सुरेश धारूरकर , अजिनाथ आदलिंग , राजेंद्र काळेल , शिवाजी जाधव , भुषण जौंजाळ , राजू भोंग , किरण लंगोटे उपस्थित होते.

# माजी सैनिकांतून लिपिक टंकलेखकांच्या कंत्राटी पदांची भरती

**पुणे । प्रतिनिधी**

जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय येथे लिपिक टंकलेखकांची पदे निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात एकत्रित मानधनावर सैन्य सेवेतून सेवानिवृत्त झालेल्या माजी सैनिकांमधून भरण्यात येणार असून इच्छुकांनी १५ जुलैपर्यंत अर्ज करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

लिपिक टंकलेखक पदासाठी उमेदवारांकडे मराठी टंकलेखनाचा वेग दर मिनिटास किमान ३० शब्द व इंग्रजी टंकलेखनाचा वेग दर मिनिटास किमान ४० शब्द असल्याचे वाणिज्य प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. तसेच सैन्य सेवेचा अनुभव व पात्रतादेखील गृहीत धरली जाईल. अर्जासोबत सैन्य सेवेतील पीपीओ, डिस्चार्ज बुक, माजी सैनिक ओळखपत्र, मराठी व इंग्रजी टंकलेखनाच्या प्रमाणपत्राची छायांकित प्रत जोडणे आवश्यक आहे. विहित मुदतीत अर्ज प्राप्त झालेल्या उमेदवारांना मुलाखतीस पत्राद्वारे, ईमेलद्वारे कळविण्यात येईल. उमेदवारांनी अर्ज सादर करण्याकरीता जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, पुणे येथे संपर्क साधावा, असे आवाहनही जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी लेफ्टनंट कर्नल हंगे स. दै. (नि.) यांनी केले आहे.

# राष्ट्रवादी (अजित पवार) कार्यकर्त्यांना मिळणार बूस्टर डोस

**बारामती । प्रतिनिधी**

बारामती लोकसभा मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाला पराभवाची चव चाखावी लागल्यानंतर तब्बल दीड महिन्याने येत्या १४ जुलैला पक्षाच्या वतीने बारामतीत जनसन्मान मेळावा आयोजित करण्यात आला आहे.

विधानसभेची तयारी

लोकसभा निवडणुकीनंतर आता विधानसभेच्या अनुषंगाने तयारीचा एक भाग म्हणून हा मेळावा आयोजित करण्यात आला आहे. यासाठी राज्यभरातील राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते हजेरी लावणार आहेत. हा मेळावा भविष्यातील वाटचालीबद्दल महत्त्वाचा संदेश देणारा ठरणार असल्याची चर्चा बारामतीत आहे. उपमुख्यमंत्री तथा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष अजित पवार लोकसभा निवडणुकीनंतर बारामतीत एकाही कार्यक्रमास उपस्थित राहिले नव्हते. संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्यात बारामती ते काटेवाडीपर्यंत त्यांनी सहभाग घेतला होता.

मात्र, लोकसभा निवडणुकीनंतर प्रथमच राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने मोठ्या कार्यक्रमाचे आयोजन यानिमित्त केले आहे. १४ रोजी



जनसन्मान रॅलीही आयोजित करण्यात आली आहे. ही रॅली पक्षाच्या कार्यकर्त्यांना, भविष्यातील वाटचालीच्या दृष्टीने महत्त्वाचा संदेश देणारी ठरणार आहे.

लोकसभेनंतर बारामतीत पहिल्यांदाच

या रॅलीत पक्षाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे, खासदार प्रफुल्ल पटेल यांच्यासह राज्यातील प्रमुख नेते सहभागी होणार आहेत. बारामतीत पराभव झाल्यानंतर उपमुख्यमंत्री अजित पवार कोणत्याही कार्यक्रमाला बारामतीत उपस्थित राहिले नव्हते. मात्र, आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर कार्यकर्त्यांना पाठबळ मिळावे, यादृष्टीने १४ रोजी जनसन्मान रॅलीत ते सहभागी होणार आहेत.

कार्यकर्त्यांना पाठबळ

लोकसभा निवडणुकीत झालेल्या पराभवानंतर आगामी विधानसभा निवडणुकीची राष्ट्रवादीकडून जोरदार तयारी सुरू असल्याचे स्पष्ट दिसत आहे. आगामी विधानसभेला अजित पवार यांच्यासमोर बारामतीत तगडे आव्हान असण्याची शक्यता आहे.

पवारांच्या भाषणाकडे लक्ष

या रॅलीत उपमुख्यमंत्री अजित पवार काय बोलणार? याकडे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या कार्यकर्त्यांचे लक्ष लागले आहे. तसेच, पवार पदाधिकार्यांना आणि कार्यकर्त्यांना काय संदेश देतात? याकडे लक्ष लागले आहे.

# तळेगांव दाभाडे येथील मुख्याधिकारी यांच्या कारकिर्दीतील कारभाराच्या चौकशीसाठी समिती- मंत्री उदय सामंत

**मुंबई । प्रतिनिधी**

पुणे जिल्ह्यातील मावळ तालुक्यात तळेगांव दाभाडे नगर परिषदेचे मुख्याधिकारी यांच्या विरोधातील तक्रारीनुसार त्यांना निलंबित करण्यात आले आहे. संबंधित मुख्याधिकारी यांच्या कारकिर्दीतील सर्व कारभाराची चौकशी करण्यासाठी भारतीय प्रशासकीय सेवा व भारतीय पोलीस सेवेतील अधिकाऱ्यांची चौकशी समिती स्थापन करण्यात येईल, असे मंत्री उदय सामंत यांनी लक्षवेधी सुचनेच्या उत्तरात सांगितले.

विधानसभेत याबाबत सदस्य सुनील शेळके यांनी लक्षवेधी सूचना मांडली होती. या सुचनेच्या चर्चेमध्ये



सदस्य मनीषा चौधरी यांनीही भाग घेतला.

मंत्री श्री. सामंत पुढे म्हणाले की, मुख्याधिकारी यांच्या तक्रारींबाबत उपविभागीय अधिकारी, मावळ यांच्यामार्फत चौकशी अहवाल प्राप्त झाला आहे. तसेच संबंधित मुख्याधिकारी यांनी १ जून २०२४ रोजी मद्य प्राशन करून वाहन चालवित अपघात केल्याप्रकरणी तळेगांव दाभाडे पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# सावधान! पुढील तीन दिवस पुण्यासह महाराष्ट्रात दमदार पावसाची शक्यता; हवामान विभागाचा अंदाज काय?

**पुणे । प्रतिनिधी**

राज्यातील बहुतांश भागात कोसळणाऱ्या मुसळधार पावसानं अक्षरशः झोडपून काढले आहे. तर रविवारच्या रात्री पासून सुरू असलेल्या दमदार पावसामुळे सर्वत्र एकच दाणादाण उडवत जनजीवन विस्कळीत केल्याचे बघायला मिळाले आहे. असे असताना पुढील तीन दिवस पुण्यासह महाराष्ट्रात चांगल्या पावसाचा अंदाज पुणे हवामान खात्याकडून वर्तवण्यात आला आहे.

खास करून कोकण भाग आणि पश्चिम महाराष्ट्रातील डोंगर माथ्यांवर चांगला पाऊस होण्याची शक्यता हवामान खात्याकडून वर्तवण्यात आली आहे. संभाव्य पावसाचा इशारा लक्षात घेता योग्य ती खबरदारी घेण्याचे आवाहन ही हवामान विभाग आणि स्थानिक जिल्हा प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

यंदा समाधानकारक पाऊस

अलिकडे झालेल्या पावसामुळे शेतकरी राजा देखील काहीसा सुखवलेला आहे. तर विदर्भातील बुलढाणा, अकोला, वाशिम आणि राज्यातील इतर काही जिल्ह्यात अतिवृष्टी झाल्याने शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले आहे. तर पूर्व विदर्भात अद्याप दमदार पावसाची प्रतीक्षाच असल्याचे चित्र आहे. त्यामुळे कुठे अतिवृष्टी तर कुठे पावसाने दांडी दिल्याने बळीराजा मोठ्या विवंचनेत सापडला आहे. गेल्या वर्षी अल



निनोचा परिणाम होता. त्यामुळे समाधानकारक पाऊस झाला नाही. मात्र यावेळेस आनंदाची बातमी आहे ती म्हणजे ला निनो पश्चिम उपसागरात तयार होण्याची शक्यता आहे. ज्याच्यामुळे चांगला पाऊस आपल्याला मिळू शकतो. अशी दिलासादायक शक्यता हवामान खात्याकडून वर्तवण्यात आली आहे.

घाट माथ्यावर जाताना सतर्कता बाळगावी

अशातच, काल सोमवारी वर्तवण्यात आलेला अंदाज हा फक्त तीन तासांसाठी आणि विशेषत: शहरासाठी वर्तवण्यात आला होता आणि ऑरेंज अलर्ट हा पुणे शहरासाठी नाही तर फक्त घाटमाथा परिसरासाठी वर्तवण्यात आला होता, अस स्पष्टीकरण ही हवामान खात्याने दिलेलं आहे. परिणामी, अजूनही घाट माथ्यावर जाताना सतर्कता बाळगावी, अस आवाहन हवामान खात्याने केलं आहे.

हजारो शेतकर्यांना अतिवृष्टीचा फटका, बळीराजा पुन्हा हवालदिल

बुलढाणा जिल्ह्यात काल, सोमवारी दिवसभर झालेल्या पावसाने कहरच केला आहे. यंदाच्या पावसाळ्यात जिल्ह्यातील १७ महसूल मंडळात अतिवृष्टी झाल्याने जवळपास ११ हजार हेक्टर वरील पिकाचे नुकसान झालं आहे. तर पंधरा हजार शेतकऱ्यांना या अतिवृष्टीचा फटका बसला आहे. अनेक ठिकाणी शेतकऱ्यांचं शेती साहित्य सुद्धा वाहून गेला आहे. त्यामुळे आता शेतकरी हवालदिल झाला आहे. जिल्ह्यातील मोताळा, खामगाव, नांदुरा आणि शेगाव या चार तालुक्यात काल दिवसभर पाऊस कोसळला. सर्वात जास्त पाऊस खामगाव तालुक्यातील आवार या महसूल मंडळात २१९.३ मिलिमीटर पाऊस कोसळला. त्यामुळे या परिसरात मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याची माहिती असून शेतकरी पुन्हा आर्थिक अडचणीत सापडला आहे.

# पुणे साथीच्या रोगांचं हॉटस्पॉट बनतंय का? लहान मुलांना झिका व्हायरसचा धोका आहे का?

पुणे : शहरातील झिकाच्या रुग्णांची संख्या सातत्याने वाढत असून ती आता १६ वर गेली आहे. कोरोनाचा पहिला रुग्ण पुण्यात आढळला होता आणि झिकाचा पहिला रुग्णदेखील पुण्यात आढळला आहे. त्यामुळे पुणं हे साथीच्या रोगांचं हॉटस्फॉट बनत आहे का? हॉटस्फॉट बनत असेल तर त्याची कारणं काय आहेत? लहान मुलांना झिकाचा धोका आहे का? असे प्रश्न समोर येत आहेत.

पुण्यात झिकाचा रोज एक रुग्ण वाढत आहे. हे एकाच परिसरातील रुग्ण नसून विविध परिसरातील रुग्ण आहेत. आतापर्यंत ८ गरोदर महिलांना झिकाची लागण झाली आहे. त्यांना निरीक्षणाखाली ठेवलं आहे.

खासगी रुग्णालयांशी संपर्क साधून त्यांच्यासोबत महापालिकेच्या डॉक्टरांनी बैठक घेतली आणि त्या रुग्णालयातील गरोदर महिलांची माहिती मागवली आहे. त्या रुग्णालयांनादेखील झिका संदर्भात सतर्क करण्यात आलं आहे.

पुणं हे साथीच्या रोगाचं हॉटस्पॉट नाही

पुण्यात छखत सारख्या केंद्रीय संस्था आहेत. ज्याच्या माध्यमातून निदान करणं सोपं जातं आणि जनजागृती करता येते. त्यासोबत



राज्यस्तरीय संस्था आहेत. त्यादेखील अशा प्रकारच्या साथीच्या किंवा संसर्गजन्य रोगांवर काम करतात. त्यामुळे निदान करणं किंवा व्हायरलचा प्रादुर्भाव रोखणं सोपं जातं.

झिका हा संसर्गजन्य आजार नाही

पुण्यातील वस्ती असलेल्या परिसरात आणि सोसायट्या असलेल्या परिसरातदेखील झिकाचे रुग्ण आढळले आहे. झिकाचे डास हे थोड्याशा साठलेल्या पाण्यातच तयार होतात. त्यामुळे घरात जर पाण्याची साठवणूक करत असाल तर एक दिवस ड्राय डे पाळणं गरजेचं आहे.

झिका डासांचे अंडी आढळणाऱ्या सोसायट्यांना दंड करण्यात येतोय. मात्र दंड न करता जनजागृती करणं हा या मागचा हेतू आहे. लहान मुलांना झिकाचा धोका नाही. मात्र त्यांच्या आहाराकडे योग्य लक्ष ठेवणे, व्हायरल इन्फेक्शन होणार नाही याची काळजी घेणं गरजेचं आहे.

झिका हा डेंग्यू आणि चिकुन गुनिया सारखा एडिस डासांमुळे पसरणारा विषाणूजन्य आजार आहे. हा आजार विशेष घातक नसला तरी झिका प्रभावित गर्भवती महिलांमध्ये जन्मलेल्या बाळांच्या मायक्रोसेफली (मेंदूचा आकार लहान असणे) या स्थितीशी संबंधित आहे. भारतात २०१६ मध्ये गुजरात राज्यात प्रथम झिका विषाणूच्या संसर्गाची नोंद झाली होती.

# यवतमध्ये ओडीशातील विवाहितेचा संशयास्पद मृत्यू

केडगाव : यवत (ता.दौंड) येथे महिलेचा शंकास्पद मृत्यू झाला आहे, प्रथमदर्शनी तिने गळफास घेतला आहे अशी पोलिसात खबर देण्यात आलेली आहे. महिलेचे नाव मनिका प्रसाद जेना असे पोलिसांना मिळाले असून तिचा काही महिन्या पूर्वी विवाह झाला होता. हा प्रकार १० जुलै मध्यरात्री १२ ते १ वाजण्याच्या सुमारास झालेला आहे. यवत ग्रामीण रुग्णालय मधील डॉ. आशिष पेंदोर यांनी या मृत्यू बाबत शंका असल्याचे सांगितले असून शवविच्छेदनासाठी ससून रुग्णालयाकडे त्यांनी मृतदेह पाठवलेला आहे.

संशयास्पद मृत्यू

ओडिसा राज्यातील मनिका जेना ही २६ वर्षाची तरुणी गळफास घेऊन मृत्यू पावल्याची बातमी यवत पोलिसांना मिळाली. यावेळी प्राथमिक तपास पोलीस प्रकाश झेंडे यांनी प्राथमिक निकषानुसार आत्महत्या प्रकरणी गुन्हा नोंदवलेला



आहे. मयत मनिका हीचा मृतदेह यवत येथील ग्रामीण रुग्णालयात नेले असता यावेळी तिथे असणारे डॉ. आशिष पेंदोर यांनी प्राथमिक तपासणी केली असता हा मृत्यू शंकास्पद आहे अशा स्वरूपाचं मत व्यक्त केलं आणि शवविच्छेदनेसाठी पुणे येथील ससून रुग्णालयाकडे ते पाठविले जाईल अशी माहिती पोलिसांना दिली.

नक्की काय आहे प्रकरण?

मोनिका हिचा रेतन मो या तरुणाशी विवाह झालेला होता. काही महिन्यापूर्वीच ते येवत येथे आले होते. अशी माहिती डाँ. पेंदोर यांनी दिलेली आहे यवत येथील भवानीनगर मधील सारिका अर्जुन गायकवाड यांच्या खोलीत हे प्रकरण घडलं असं नमूद करण्यात आले असले तरी सदर ठिकाणी माहिती घेतली असता या प्रकरणाशी ठेकेदारीतील माणसं जोडलेली आहेत अशी सुद्धा परिसरात मोठी चर्चा आहे. भांडगाव परिसरामध्ये काही कंपनीमध्ये ठेका घेणाऱ्या व्यक्तींकडून या ओडीसा राज्यातून काही लोक आणले जातात आणि यापैकी मृत व्यक्ती आहे अशी सुद्धा जोरदार चर्चा आहे.

मणिकाने हे पाऊल का उचलले?

यवत पोलिसातील प्राथमिक तपास अधिकारी प्रकाश झेंडे यांना विचारले असता सध्या तरी हे प्रकरण आत्महत्या म्हणून नमूद केले गेलेला आहे यातील पुढील तपासांती तसेच शवविच्छेदन प्रमाणपत्र मिळाल्यानंतर त्यातील माहितीनुसार गुन्हा नोंद करण्यात येईल.

मणिका २६ वर्षाची तरुणी होती. काही महिन्यापूर्वीच तिने विवाह केला होता आणि तिच्यावर अशी स्वरूपाची वेळ का यावी हा प्रश्न या सगळ्या प्रकरणाला वेगळ्या स्वरूपाचं वळण देणार आहे हे मात्र यातून तपास नक्की काय होतो आहे या कडे सर्वांचे लक्ष लागलेले आहे.

# पुण्यातील महावितरण कार्यालात शिरला बिबट्या; उडाली धांदल, कर्मचाऱ्यांनी ठोकली धूम

**पुणे । प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील प्रमुख शहरांपैकी एक असलेल्या मेट्रोपोलियन सिटीमध्ये पुण्याचा (झीपिश) समावेश आहे. त्यामुळे, पुणे शहरातील नागरिकांच्या सोयी-सुविधा आणि तेथील प्रश्नांना कायम प्राधान्याने नेतेमंडळीही स्थान देतात. त्यातच, गेल्या काही दिवसांपासून पुण्यातील गुन्हेगारीच्या घटनांमुळे पुणे शहर राज्यात चर्चेत आहे. पुणे पोर्शे कार हीट अँड रन, तरुणाईचा ड्रग्ज आणि पब्जच्या विळख्यात अडकेला पाय, यामुळे पुणे पोलिसांच्याही रडावर आहे. तर, आता पुणे शहरात आज चक्क बिबट्याचे दर्शन घडल्याने पुणेकरांच्या सर्वसामान्य सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. यापूर्वी पुण्यात रानगवा आल्यामुळे पालिका प्रशासन व वन विभाग खडबडून जागे झाले होते. आता, चक्क बिबट्याने (ङशेरीव) महावितरण कार्यालयात हजेरी लावल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. तर, काहींनी बिबट्याला वाहून भुवयाही उंचावल्या होत्या.

पुण्याच्या राजगुरुनगर येथील महावितरण कार्यालयात भरदुपारी बिबट्या शिरल्याने कार्यालयातील सर्वांचीच घाबरगुंडी झाली. विशेष म्हणजे कार्यालय कामकाज सुरू असतात बिबट्या कार्यालयात घुसल्याने कर्मचाऱ्यांची धांदल उडाली. अनेक कर्मचारी आपलं कार्यालय सोडून बाहेर पळाल्याचं पाहायला मिळालं. येथील महावितरण कार्यालयातील मीटर टेस्टिंग विभागात महिला कर्मचारी काम करता असताना बिबट्याची एन्ट्री झाली होती. त्यामुळे चांगलाच गोंधळ उडाला होता.

महावितरणच्या अधिकाऱ्यांकडून तात्काळ वनविभागाला पाचारण करण्यात आलं होतं, बिबट्या कार्यालयात आल्याची माहिती देण्यात आल्यानंतर वन विभागाने घटनास्थळी धाव घेत मोठ्या मेहनतीने बिबट्याला जेरबंद केलं. तत्पूर्वी बिबट्याला पाहण्यासाठी महावितरण कार्यलयात गर्दी केलेल्या नागरिकांनी बिबट्याला पाहून एकमेकांची चांगलीच मजा घेतली. तसेच, ये पुढे जाऊ नका तो जंप मारंल, ऐ लय मोठा हाय की.. असा संवाद तेथील नागरिकांचा ऐकू येतो.